
AROTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. ०१ मार्च २०२६




दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# दुबई-अबू धाबीवर इराणचा हल्लाबोल

## जगातील उंच इमारत निशाण्यावर, बुर्ज खलिफा इमारत केली रिकामी

(समर्थ गांवकरी)

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर संयुक्त एअर स्ट्राइक करत त्याच्या 30 हून अधिक शहरांना लक्ष्य केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर इराणने 'ऑपरेशन फतह-ए-जंग' अंतर्गत पश्चिम आशियातील 8 पेक्षा अधिक देशांवर क्षेपणास्त्र हल्ले करत पलटवार केला आहे. इराणच्या हल्ल्यातून दुबई आणि अबू धाबी देखील सुटलं नाही. जगातील सर्वात उंच इमारत असलेल्या दुबईतील बुर्ज खलिफाजवळही इराणने अणवस्त्राचा हल्ला केल्याची माहिती आहे. त्यामुळे पर्यटकांना आणि रहिवाशांना बाहेर काढून ही इमारत आता रिकमी करण्यात आल्याची माहिती आहे.



दुबईतील पाम जुमेराह परिसरातील Fairmont The Palm या सुप्रसिद्ध हॉटेलवर क्षेपणास्त्र हल्ला झाल्याची माहिती आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये इमारतीला भीषण आग लागल्याचे दिसत आहे. आकाशात धुराचे प्रचंड लोट उसळताना दिसत आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मोठा स्फोट झाल्यानंतर 'द पाम' परिसरातून धूर उसळताना दिसला. घटनास्थळी रुग्णवाहिका आणि आपत्कालीन यंत्रणा दाखल झाल्या आहेत. दुबईतील जगातील सर्वात उंच इमारत बुर्ज खलिफा येथील नागरिक आणि पर्यटकांना सुरक्षिततेच्या कारणास्तव बाहेर काढण्यात आल्याची माहिती आहे. शहरातील नागरिकांनी आकाशात क्षेपणास्त्रे वेगाने जाताना पाहिल्याचे सांगण्यात येत आहे. दुबई, जे पश्चिम आशियातील प्रमुख व्यापारी केंद्र मानलं जातं, त्या ठिकाणी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शनिवारी सकाळी इराणची राजधानी तेहरानवर अमेरिका-इस्रायलने संयुक्त हल्ला केला. त्यानंतर इराणने आखाती परिसरातील अनेक देशांवर प्रत्युत्तरादाखल क्षेपणास्त्र हल्ले केले. त्यामुळे अनेक देशांमध्ये हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आल्या. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ स्फोटांचे आवाज ऐकू आल्याने सर्व उड्डाणे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली आहेत. संयुक्त अरब अमिरातने अबू धाबीमध्ये एका नागरिकाच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. तर कतार, बहरेन, कुवैत आणि सौदी अरेबिया यांनी क्षेपणास्त्रे अडवण्यात यश आल्याची माहिती दिली आहे. इस्रायलमध्ये अनेकदा सायरन वाजवण्यात आले असून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. सोशल मीडियावर शेअर झालेल्या व्हिडीओमध्ये दुबईतील पर्यटक पूल परिसरातून घाबरून पळताना दिसत आहेत.

## 'तुमचे सरकार ताब्यात घ्या', ट्रम्प यांचे इराणी जनतेला आवाहन

इराणची राजधानी तेहरानवर इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे हल्ला केल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक निवेदन प्रसिद्ध केलं. आज सकाळी इराणच्या विविध शहरांवर क्षेपणास्त्र डागल्यानंतर त्यांनी या हल्ल्यामागे अमेरिका आणि इस्रायल यांचा सहभाग असल्याचं मान्य केलं. ट्रुथ सोशल मीडियावर ट्रम्प यांनी एक सविस्तर व्हिडीओ शेअर केला. ज्यात त्यांनी इराणी जनतेलाही आवाहन केलं. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, "तुमच्या स्वातंत्र्याची वेळ जवळ आली आहे. युद्धादरम्यान सुरक्षित स्थळी आश्रय घ्या. तुमच्या घरातून बाहेर पडू नका. बाहेर सध्या धोका असेल. सर्वत्र बॉम्बचा वर्षाव होत असेल. जेव्हा आमचा हल्ला पूर्ण होईल. तेव्हा तुम्ही तुमचे सरकार ताब्यात घ्या. ते तुमचे स्वतःचे सरकार असेल." इस्रायल आणि इराणमधील या युद्धाच्या घडामोडीबाबत इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी पोस्ट शेअर करत म्हटलं की, "एक तासापूर्वी इस्रायल आणि अमेरिकेने इराणमधील दहशतवादी राजवटीने निर्माण केलेल्या अस्तित्वाच्या धोक्याचं उच्चाटन करण्यासाठी एक मोहीम सुरू करण्यात आली आहे. मी माझे मित्र राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं त्यांच्या ऐतिहासिक नेतृत्वाबद्दल आभार मानतो.

# विविध विकास कामांचे रविवारी भूमिपूजन व लोकार्पण सोहळा



संगमनेर : (समर्थ गांवकरी)

- पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. डॉ सुजय विखे पा व आमदार अमोल खताळ पा यांची प्रमुख उपस्थिती

संगमनेर तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभ हस्ते होणार आहे. संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी ते शिरापूर रस्त्यावरील सुमारे ३ कोटी २४ लाख ७० हजार रुपये पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. तसेच हिवरगाव पावसा येथील निळवंडे प्रकल्प अंतर्गत उर्ध्व प्रवरा उजवा कालवा (सा. क्र. ३५७३०) येथे सुमारे १ कोटी.३२ लाख रुपयांच्या सी.आर. एस्केप कामाचे लोकार्पण होणार आहे.या शिवाय पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग वरील रायतेवाडी फाटा ते संगमनेर खुर्द दरम्यान उभारण्यात आलेल्या पथदिव्यांचेही लोकार्पण करण्यात येणार आहे.या सर्व कार्यक्रमांना महायुतीचे पदाधिकारी आणि कार्य कर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चंदनापुरी, हिवरगाव पावसा, रायतेवाडी आणि संगमनेर खुर्द येथील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केले आहे.

## सभागृहात नगरसेवकांची गरमागरमी

मुंबई : (समर्थ गांवकरी)

मुंबई महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी दादरसह माटुंगा परिसरातील फेरीवाल्यांवरील कारवाईचा आढावा घेत त्या भागांना प्रत्यक्ष भेटी दिल्यानंतर तसेच महापालिका सभागृहात फेरीवाला माफियांविरोधात नगरसेवकांकडून कारवाईची मागणी केल्यानंतरही दादर पश्चिम रेल्वे स्थानक परिसरात फेरीवाल्यांना हटवण्यात महापालिकेला अपयश येत आहे. महापालिका आणि पोलिस यांच्या माध्यमातून संयुक्त कारवाई केली जात असली तरी प्रत्यक्षात कारवाई करणारे पथक पुढे निघून गेल्यानंतर स्थानक परिसरातच मोठ्याप्रमाणात फेरीवाले व्यवसाय करत असल्याने आता या फेरीवाल्यांना महापालिका आणि पोलिसांची भीतीच वाटत नाही की चिरीमिरी दिल्यामुळे पोलिस आणि महापालिकेचे अधिकारी केवळ कारवाईचे नाटक करून त्यांना व्यवसाय करण्यास देत आहेत असा सवाल उपस्थित होत आहे. मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ अश्विनी जोशी यांनी फेरीवाल्यांसह अतिक्रमण हटवण्याची जी मोहिम हाती घेतली आहे, त्याचे परिणाम आता मुंबईत दिसून येत आहे.

## ऑनलाईन फूड डिलिव्हरी कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी सक्तीची

मुंबई : (समर्थ गांवकरी)



राज्यातील ऑनलाईन खाद्यपदार्थ वितरण करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या वितरण कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी करणे आता सक्तीचे राहणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत दिला.

प्रश्नोत्तराच्या तासात भाजप आमदार भिमराव तापकीर यांनी हा मुद्दा उपस्थित करत झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट, झेप्टो, अमेझॉन आदी कंपन्यांच्या डिलिव्हरी कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी अनिवार्य करण्याबाबत शासन भूमिका स्पष्ट करणार का, असा प्रश्न उपस्थित केला. तसेच, पडताळणी न करता कर्मचारी नेमल्यास दंडात्मक कारवाई होणार का आणि ग्राहकांना ॲपवर संबंधित डिलिव्हरी कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत आदेश दिले जाणार का, अशीही विचारणा करण्यात आली. यावर उत्तर देताना मंत्री फुंडकर म्हणाले की, या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांची नोंदणी प्रामुख्याने त्रयस्थ संस्थांमार्फत आणि ऑनलाईन अर्ज प्रक्रियेद्वारे केली जाते. 'पार्टनरशिप'च्या स्वरूपात करार होत असल्याने कंपन्या थेट जबाबदारी झटकत असल्याचे दिसते. मात्र अलीकडील घटनांच्या पार्श्वभूमीवर गृह विभागाकडून सूचना मागवण्यात आल्या असून कामगार विभागाने चारित्र्य तपासणी अनिवार्य करण्याबाबत सुचना केल्या आहेत. सध्या अनेक कंपन्यांकडून पोलीस पडताळणी केली जात असली तरी, येत्या काळात सर्व आस्थापनांना स्पष्ट निर्देश देण्यात येतील की, पडताळणी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही कामगाराची नोंदणी करू नये. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्याला कामावरून कमी करणे तसेच कंपनीविरुद्ध कारवाई करणे आवश्यक राहील, असेही मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे ग्राहकांच्या सुरक्षेबाबत अधिक विश्वास निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अहिल्यानगरमध्ये ३० गाई दगावल्या

## पशुवैद्यकीय प्रयोगशाळेतही निदान नाही; तज्ज्ञांचे पथक देणार भेट

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर व पारनेर तालुक्यातील काही गावांमध्ये गेल्या पंधरा दिवसात ३० गाईंचा अज्ञात आजाराने मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. पशुवैद्यकीय विभागाच्या पथकाने मृत्युमुखी पडलेल्या गाईंचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले, मात्र आजाराचेच निदान स्पष्ट झालेले नाही. दरम्यान आमदार काशिनाथ दाते व राज्य सरकारच्या आदर्शगाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदन देऊन केली आहे. दरम्यान आमदार दाते, पोपटराव पवार, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांच्यासह अधिकाऱ्यांच्या पथकाने या गावांना भेटी देत, तपासणी केली तसेच शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन माहिती घेतली. उपायुक्त डॉ. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार लागण झालेल्या गाईंवर उपचार तसेच लसीकरण करण्यात आले मात्र त्यांना प्रतिसाद मिळालेला नाही. प्रयोगशाळेचे अहवाल प्राप्त झाले मात्र त्यामध्ये निदान स्पष्ट झालेले नाही. दरम्यान शिरवळ येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञांचे पथक उद्या, रविवारी गाई दगावलेल्या गावांना भेटी देऊन तपासणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यानगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरेबाजार व टाकळी खादगाव तसेच पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ या परिसरात गेल्या दि. १३ पासून आत्तापर्यंत शेतकऱ्यांच्या गोठ्यातील ३० गाई दगावल्या. प्रथम दत्तात्रय बांगरे यांच्या गोठ्यातील गाय दगावली. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून नमुने प्रयोगशाळेकडे पाठवले, मात्र त्यानंतर रोजच गाई दगावण्याच्या घटना होऊ लागल्या. आज, शनिवारी दोन गाई दगावण्याच्या घटना घडल्या आहेत. पशुवैद्यकीय विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार दैठणे गुंजाळमध्ये सुमारे १३००, हिवरे बाजारमध्ये १२०० व टाकळी खादगावमध्ये सुमारे ९०० अशा एकूण ३५०० हून अधिक गाईंची संख्या आहे.




# युवानेते करण येंड्रलवार यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## सिद्धार्थ नगर येथे भव्य कार्यक्रम व लाडू तुला

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना पक्षाचे युवानेते करण येंड्रलवार यांचा वाढदिवस किनवट शहरात दिवसभर विविध सामाजिक, धार्मिक व जनकल्याणकारी उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. अन्नदान, १०१ रक्तदात्यांच्या सहभागातून पार पडलेले रक्तदान शिबिर, इफ्तार पार्टी, मंदिरांमध्ये पूजाअर्चा अशा उपक्रमांमुळे वाढदिवसाला सामाजिक जबाबदारीची वेगळीच छटा लाभली.

वाढदिवसानिमित्त करण येंड्रलवार यांनी श्री अय्यप्पा स्वामी मंदिर, राम मंदिर, विठ्ठलेश्वर मंदिर, नर्मदेश्वर साई मंदिर आदी ठिकाणी जाऊन विधिवत पूजाअर्चा केली. शहराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. नगरपरिषद परिसरात शिवसेना शहर प्रमुख प्रशांत कोरडे व माजी शहर प्रमुख संतोष येलचलवार यांच्या परिश्रमातून व नियोजनातून आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १०१ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून शिबिर यशस्वी केले. या उपक्रमातून वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. शहरातील विविध भागांत अन्नदानाचे कार्यक्रम राबविण्यात आले. संध्याकाळी रोजा पाळणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक ऐक्य व सौहार्दाचे दर्शन या उपक्रमातून घडले. छत्रपती शिवाजी महाराज



चौक येथे मनसे जिल्हा पदाधिकारी नितीन मोहरे व समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत केक कापून वाढदिवस साजरा केला. शहरातील सरदार नगर, धनराज टाकीज समोर, स.वि.म परिसर आदी भागांत युवकांनी मोठ्या उत्साहात जल्लोष केला. आठवडी बाजारपेठेतील के.टी.एच ग्रुपने ही वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला. मुख्याधिकारी मुगाजी काकडे व कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांनी नगर परिषद कर्मचारी तर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तर जिल्ह्यातील नेते मंडळी प्रत्यक्ष व दूरध्वनीवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होते यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते कैलास गोरठेकर पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख दयाळ गिरी, जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, युवा सेना जिल्हाप्रमुख यश खराटे, तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन तसेच सोशल



मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. तर नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, राजेश जोशी, मुकेश नेम्मानिवार, राजू सातूरवार, साहिल सिरमनवार, मनीष ताडपेल्लीवार, शिवा तिरमनवार, अनिल कोटिलवार, मुन्ना पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने सहकारी समर्थ उपस्थित होते. प्रभाग क्रमांक ७ च्या नगरसेविका ललिता मारुती मुनेश्वर यांच्या वतीने सिद्धार्थ नगर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी करण येंड्रलवार यांची लाडू-तुला करण्यात आली. समर्थकांनी पुष्पहार व गोडधोड देऊन अभिष्टचिंतन केले. दिवसभर किनवट शहरासह तालुका, माहूर तालुका व जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी, शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने शुभेच्छा देण्यासाठी दाखल झाले. नगरपरिषद किनवट कार्यालयात तसेच त्यांच्या निवासस्थानी भेटीगाठी चा सिलसिला सुरू होता. महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थितीही लक्षणीय होती. कार्यक्रमाच्या शेवटी बोलताना करण येंड्रलवार म्हणाले, "मागील काळात एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरिकांचे प्रेम मिळणे व माझ्यावर प्रेमाचा वर्षाव होणे यामुळे मी भारावून गेलो आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी सामाजिक कार्य अधिक जोमाने सुरू ठेवेन." वाढदिवसानिमित्त पार पडलेल्या विविध सामाजिक उपक्रमांमुळे किनवट शहरात दिवसभर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# निवृत्ती वडगावकर यांना 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने, जीवनगौरव सन्मान' जाहीर

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या २८ व्या वार्षिक अधिवेशनात यंदाचा प्रतिष्ठेचा 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने जीवनगौरव सन्मान' निवृत्ती वडगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या निवडीमुळे ग्रंथालय क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणमंत्री मा. कमलकिशोर कदम राहणार असून उद्घाटन रविंद्र चव्हाण, खासदार (नांदेड लोकसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते होणार आहे. तसेच राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी नांदेड, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीतच निवृत्ती वडगावकर यांना जीवनगौरव सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.



ग्रंथालय चळवळीच्या उभारणीत व जतनात वडगावकर यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविणे, ग्रंथालयांचे जाळे बळकट करणे आणि तरुण पिढीला ज्ञानसंपादनासाठी प्रोत्साहित करणे या क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना सन १९८५ मध्ये 'ग्रंथालय भूषण' पुरस्कार तसेच सन १९८७ मध्ये 'तात्यासाहेब शेनई खटखटे ग्रंथालय पुरस्कार' प्रदान करण्यात आले होते.

हे अधिवेशन रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जनता हायस्कूल, नायगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात "आजची समाजमाध्यमे, वाचन संस्कृती आणि आत्मनिर्भरता" या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील ग्रंथपाल, वाचनप्रेमी नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे. निवृत्ती वडगावकर यांना जाहीर झालेला हा सन्मान नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत असून, ग्रंथालय चळवळीला नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे.

# ग्रामसेवकाचा मनमानी कारभार

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील मौ. बोळेगाव येथील उपसरपंच विठ्ठल व्यंकटी तुकडेकर व ग्रामसेवक मुरलीधर बैलके यांनी कुठलीही ग्रामसभा व ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता आपल्या मनमानी कारभाराने ग्रामविकासाच्या पंधराव्या वित्त आयोग निधीत मोठा भ्रष्टाचार करून लाखो रुपये परस्पर हडप केले आहे. याबाबत सखोल चौकशी करून संबंधित उपसरपंचावर व ग्रामसेवकावर योग्यती कार्यवाही करावी अन्यथा दि. ४ मार्च रोजी पासून बिलोली पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा लेखी इशारा ग्रामपंचायत सदस्य रुक्माबाई भ्र. हणमंत गोणेकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिला आहे. गेल्या काही दिवसापासून बोळेगाव येथील रोहयो योजनेत मोठा गैरव्यवहार झाल्याच्या ताज्या चर्चा सुरु असताना पुन्हा नव्या भ्रष्टाचाराचा पेव फुटला आहे.

# पाच तलाठी सज्जाचे 'दृश्य-श्राव्य प्रणालीद्वारे उद्घाटन

**लोहा : (समर्थ गांवकरी)**

लोहा तालुक्यातील पाच गावाच्या तलाठी सज्जाचे उदघाटन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ( 'दृश्य-श्राव्य प्रणाली) द्वारे आ प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते तहसील कार्यालय येथे करणयात आले या गावात जनतेची सोय होणार असून तलाठी यांनी सज्जावर उपस्थिती राहून ग्रामस्थांची कामे करावेत असे प्रतिपादन आ. चिखलीकर यांनी केले आहेलोहा तालुक्यातील सावरगाव (नसरत.),देऊळगाव (माळ्याचे),धानोरा (मक्ता),रिसनगाव ,दापशेड या पाच गावच्या तलाठी सज्जा कार्यालयाचे उद्घाटन आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते दृश्य श्राव्य प्रणाली द्वारे करण्यात आले तहसीलदार विठ्ठल परळीकर युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला



लोकनियुक्त नगराध्यक्ष .शरद पाटील पवार, माजी जि प सदस्य हंसराज पाटील बोरगावकर बाधकाम विभागाचे अभियंता सोमवंशी , माजी.सभापती आनंद पाटील शिंदे ,माजी.उपनगराध्यक्ष दत्ता वाले,माजी उपसभापती रोहित पाटील,गटनेते भास्कर पाटील पवार, बाबाराव पाटील गवते

काबेगावचे सरपंच दुल्लेखा पठाण,रिसनगावचे सरपंच प्रकाश पाटील पवार,दापशेडचे सरपंच वीरभद्र राजरे, भारत पाटील कदम धानोरचे माजी.सरपंच मनोहर पाटील कदम,धानोरचे माजी सरपंच आनंद पाटील कदम,चांद म शेख,खंडू माटोरे,बळीराम माटोरे,इमाम शेख,परमेश्वर भाऊ मुरकुटे,अभंग पाटील गाडेकर,नगरसेवक राजू बोडके,वैजनाथ पाटील पवार,माधव प काकडे आदी उपस्थित होते. तलाठी यांनी सज्जावर उपस्थित राहावे लोहा तालुक्यात ज्या नव्याने तलाठी कार्यालय बांधण्यात आले. त्या सज्जा च्या ठिकाणी तलाठी यांनी उपस्थित राहून सर्व सामान्य नागरीकांची कामे करावीत जेणेकरून त्याचा लोह्याला येण्या जाण्याचा वेळ व खर्च वाचेल शिवाय वेळेवर कामे होतील उर्वरित तलाठी सज्जे इमारत बांधण्यात येईल असे आ प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले .

# बनावट बालभारती पुस्तकांवर सरकारने ठोस भूमिका घ्यावी

## आ. काशिनाथ दाते सर : विधानसभेत आ. दातेंचा घणाघाती सवाल

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात एमआयडीसी परिसरातील 'प्रतिमा प्रिंटर्स' येथे बालभारतीची बनावट पाठ्यपुस्तके छापली जात असल्याच्या गंभीर प्रकरणावर तारांकित प्रश्न उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या संवेदनशील मुद्द्यावर सभागृहाचे लक्ष वेधत त्यांनी शासनाकडून स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी केली. शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी उत्तर देताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) अधिकृत कंत्राटदारांमार्फतच



पाठ्यपुस्तके छापते. मात्र नागपूर येथे संबंधित मुद्रणालयात मोठ्या प्रमाणावर बनावट पुस्तकांची छपाई होत असल्याचे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले होते. या कारवाईदरम्यान इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या सुमारे २० हजारांहून अधिक बनावट पुस्तकांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधित मुद्रणालयाविरोधात १७ डिसेंबर २०२५ रोजी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित मालकाला अटक करून साठा जप्त करण्यात आल्याची माहिती मंत्र्यांनी दिली.

यासोबतच राज्यातील इतर ठिकाणी अशा प्रकारच्या अवैध छपाईला आळा घालण्यासाठी सर्व खासगी प्रिंटिंग प्रेसची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अधिकृत व बनावट पुस्तकांतील फरक ओळखता यावा यासाठी यावर्षीपासून बालभारतीच्या पुस्तकांवर विशेष क्यूआर कोड छापण्यात येणार असून विद्यार्थ्यांना, पालकांना व पुस्तक विक्रेत्यांना जनजागृतीद्वारे माहिती देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला बाधा आणणाऱ्या आणि पालकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या या प्रकारावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी सभागृहात आवाज उठवला. त्यांच्या प्रश्नामुळे शासनाने घेतलेल्या कारवाईची सविस्तर माहिती समोर आली असून बनावट पुस्तकांवर आळा बसण्यासाठी ठोस पावले उचलली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आमदार दाते यांच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चिमुकल्यांनी अनुभवले विज्ञानाचे चमत्कार

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी आणि कल्पकता वाढवण्यासाठी पोदार प्रेप संगमनेर येथिल प्री- प्रायमरी विद्यार्थ्यांनकरिता 'थीमॅटिक टूर -सायन्स म्युझियम' हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध पैलूंची ओळख करून देणे आणि त्यांच्यातील कुतूहल जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत शाळेत विज्ञानाचे एक छोटेखानी संग्रहालय उभारण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी 'ज्वालामुखीचा उद्रेक' (Volcanic Eruption) कसा होतो, याचे प्रात्यक्षिक पाहिले. तसेच प्राचीन काळातील महाकाय 'डायनासोर' (Dinosaur) आणि त्यांच्या 'जीवाश्मांची' (Fossils) प्रतिकृती पाहून मुले थक्क झाली.

# कळसेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच पार पडलेल्या NMMS परिक्षेत श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी,मुंबई या संस्थेचे अकोले तालुक्यातील कळस येथील कळसेश्वर विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.या विद्यालयातील इ.8 तील NMMS शिष्यवृत्ती परीक्षेत 22 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी 14 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विद्यालयातील स्नेहल हरिश्चंद्र मोरे, कावेरी राजेंद्र खताळ, आराध्या संदीप वाकचौरे, श्रेया माधव कोल्हाळ, श्रेया सचिन कोकणे, आरुष अंकुश वाकचौरे, दिव्या सुखदेव वाकचौरे, दर्शन संतोष कातोरे, संनती संदीप ढगे, तनुजा रमेश ढगे, समृद्धी निलेश कोकणे, अक्षरा सुनील शिर्के, आदित्य आनंद गवांदे, सार्थक सुरेश मेंगाळ उत्तीर्ण झाले आहेत.विद्यालयातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर कार्याध्यक्ष




शिरीष नाईकवाडी , सतीश नाईकवाडी,संदीप नाईकवाडी यांनी अभिनंदन केले.तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापक संजय शिंदे, शिक्षक शिवाजी आवारी, मच्छिंद्र साळुंखे, गीतांजली खरबस, केशव महाले, प्रशांत जाधव,मनीषा शिंदे,प्रतीक्षा घुले , वंदना सातपुते,कुमार पालवे, सुरेश वाघमारे आदींचे मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हा परिषद माजी सभापती कैलासभाऊ वाकचौरे,सोन्याबापु वाकचौरे, देवराम वाकचौरे,भाऊसाहेब वाकचौरे, ईश्वर वाकचौरे, रावसाहेब वाकचौरे, ज्ञानदेव निसाळ, रामदास वाकचौरे,सरपंच राजेंद्र गवांदे, उपसरपंच केतन वाकचौरे , पोलीस पाटील गोपीनाथ ढगे, शालेय व्यवस्थापन समिती , सखी सावित्री समिती, महिला तक्रार समिती, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समितीतील सर्व सदस्य व सर्व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# विद्यार्थ्यांकडून आठवीतील मुलांवर धारदार शस्त्राने हल्ला

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुका मधील वडगाव आनंद येथील रेवबाई बालाजी देवकर विद्यालय या शासन अनुदानित शाळेत बुधवारी (दि. २५) दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास शाळेच्या आवारात दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांवर धारदार शस्त्राने हल्ला झाला. हल्ला करणारी नववीतील दोन अल्पवयीन विद्यार्थीच असल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आठवीत शिकणारे दोन विद्यार्थी शाळेतील नववीच्या विद्यार्थ्यांमधील भांडण सोडविण्यासाठी मध्यल्या सुट्टी दरम्यान शौचालयाजवळ गेले होते. त्यावेळी शाळेच्या आवारात रक्तरंजित हल्ला वाद चिघळत जाऊन नववीतील विद्यार्थ्यांनी धारदार शस्त्राने दोघांवर वार केले. घटनेनंतर शिक्षकांनी तातडीने जखमी विद्यार्थ्यांना आळेफाटा येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींपैकी एका विद्यार्थ्याच्या श्वसननलिकेला गंभीर दुखापत झाली असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. स्वरनलिका कायमस्वरूपी खराब होण्याची भीती व्यक्त केली आहे. पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी सांगितले की, दोन अल्पवयीन मुलांना मारहाण करणाऱ्या दुसऱ्या अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या शाळेत एकूण ४३२ विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. घटनेनंतर संतप्त पालकांनी शाळेत धाव घेत मुलांच्या सुरक्षेबाबत संस्थेकडे जाब विचारला. संस्था अध्यक्ष उल्हास विठ्ठल देवकर यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, घडलेला प्रकार अत्यंत निंदनीय असून यापुढे शाळेच्या आवारात असे अनुचित प्रकार होणार नाहीत, यासाठी संस्थास्तरावर आवश्यक ती काळजी घेतली जाईल.

# "वीट रचण्याआधीच फीत कापण्याची घाई; नामुष्की ओढवली तरी धडा नाही" : अशोक चेडे

**पारनेर/ता : (समर्थ गांवकरी)**

शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ पारनेर शहर विकास आराखड्याच्या मंजुरीवरून सुरू असलेल्या श्रेयवादाच्या राजकारणात आज पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांची ठिणगी पडली. नगरसेवक अशोक चेडे म्हणाले,

चेडे म्हणाले, विकास आराखड्याची प्रक्रिया ही एका दिवसात झालेली नाही. नगरपंचायत स्थापनेपासून ते मंत्रालयीन पातळीवरील पाठपुराव्यापर्यंत अनेक टप्पे पार करावे लागले. विविध नेतृत्वांनी आपापल्या काळात योगदान दिले, हे आम्ही मान्य करतो. मात्र अंतिम मंजुरीसाठी अधिकृत पाठपुरावा करून निर्णय मिळवून देण्याची जबाबदारी आमदार काशिनाथ दाते यांनी पार पाडली, ही वस्तुस्थितीच आपल्या पचणी न पडल्याने



आपल्या पोटात मळमळ होतेय हे आता पारनेरकरांपासुन लपुन राहीलेले नाही.

'आनंद की दुःख?' असा सवाल उपस्थित करणाऱ्यांना उत्तर देताना चेडे म्हणाले, "पारनेरचा विकास हा कोणाच्या मर्जीनुसार नाही; तो जनतेचा हक्क आहे. विकासाच्या निर्णयावर स्वागत करायचे की संशय व्यक्त करायचा, हे ज्याच्या त्याच्या मनावर आहे. पण मेहनत दुसऱ्याची आणि मिरवणूक आपली, ही पद्धत जनता ओळखून आहे."

सुजित झावरे पाटील यांच्या संदर्भात त्यांनी पुन्हा स्पष्ट केले, "नगरपंचायतीशी थेट संबंध नसताना आराखड्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे केवळ राजकीय प्रकाशझोतात राहण्याची धडपड आहे. मंत्रालयीन अधिसूचना कोणी 'पोस्ट' केली यावर श्रेय ठरत नाही; अधिकृत जबाबदारी आणि परिणामकारक पाठपुरावा यावरच श्रेय ठरते."

"विकासासाठी मंत्रालयात धाव घेणे गुन्हा आहे का? की श्रेयाच्या राजकारणात तथ्य मांडणेच काहींना खुपते?" असा टोला लगावत त्यांनी म्हटले की, केवळ प्रकाशझोतात राहण्यासाठी श्रेयाचे फुगे फुगवले जात आहेत.

चेडे यांनी उपरोधाने नमूद केले, "शहर विकास आराखड्याच्या मंजुरीमुळे वीट रचण्याआधीच फीत कापण्याची घाई करणाऱ्यांवर नामुष्की ओढवली, तरी आत्मपरीक्षणाचा साधा प्रयत्न दिसत नाही."

ते पुढे म्हणाले, "मेहनत दुसऱ्याची आणि मिरवणूक आपली, ही सवय पारनेरकर जनतेने ओळखली आहे. विकास हा जनतेचा हक्क आहे; तो कोणाच्या वैयक्तिक जाहिरातीचा विषय नाही. श्रेयवादाच्या आड येऊन विकासाचा वेग रोखण्याचा प्रयत्न कोणी करू नये."

या झंझावाती उत्तरामुळे पारनेरच्या राजकारणात पुन्हा एकदा वातावरण तापले असून, विकासाच्या प्रश्नावरून सुरू झालेला हा शब्दसंघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

### "गाड्या बरोबर नळ्याची जत्रा ही अवस्था तुमची"

"अरुणराव, आपला आणि शिवसेनेचा सहवास किती? शहर विकास आराखड्याच्या मंजुरीसाठी वेळ लागला किती? या मंजुरीसाठी आपण कष्ट केले किती? आणि आता श्रेय लाटण्याचा अट्टाहास करताय किती? हे काय पारनेरच्या जनतेला कळतच नाही, असं तुम्हाला वाटतंय काय?"

**- नगरसेवक अशोक चेडे**

# पूर्ण भावाने सद्गुरूंना शरण जातो त्याला ब्रह्मप्राप्ती होतं असते

## ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी : वडझिरे अखंड हरीनाम सप्ताह

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

श्रीसंत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास 50 वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.भव्य कीर्तन सोहळ्यातील पाचव्या दिवसाचे कीर्तनपुष्प संत एकनाथ महाराजांचे वंशज,हभप योगीराज महाराज गोसावी यांनी गुंफले.



यावेळी निरूपण करताना,हभप योगीराज महाराज गोसावी यांनी "सद्गुरुसी शरण जाय,त्यासी ब्रम्हप्राप्ती होय." या संत एकनाथ महाराजांच्या अभंगावर निरूपण केलें. यावेळी बोलताना महाराज म्हणाले,कसं वागावं काय कराव हे शिष्याला गुरु सांगतो. सद्गुरुचे चरण तीर्थ मस्तकाला लावायचे असते ते पवित्र असते. संसार सागरातून तरुण जाण्या साठी गुरू करावाच लागतो. गुरुचे स्थान सर्वोच्च असून,जो साधक पूर्ण भावाने सद्गुरूंना शरण जातो त्याला ब्रह्मप्राप्ती होतं असते. यासाठी अन्य कोणतीही कठीण साधना किंवा उपाय करण्याची गरज नाही.फक्त सद्गुरूंचे चरण घट्ट धरावेत म्हणजेच त्यांच्या चरणी अनन्य शरण जायला हवे असेही महाराज म्हणाले.

जेव्हा एखादा साधक अहंकार सोडून सद्गुरूंच्या चरणी अनन्य भावाने शरण जातो.तेव्हा सद्गुरूच त्याला आत्मज्ञान किंवा ईश्वर प्राप्ती करून देतात.तसे गुरुविना ज्ञान मिळणे शक्यच नाही.आणि त्यांच्या कृपेनेच शिष्याला सर्वोच्च स्थिती प्राप्त होते.

गुरूने शिष्याची सेवा घायची नाही. आणि शिष्याने सेवा केल्याशिवाय राहू नये.सद्गुरूंचा आश्रय घेतला की इतर योगसाधना तप किंवा उपासनेची गरज राहत नाही. सर्व साध्य-साधनेचा अर्थ सद्गुरूंच्या चरणांमध्येच सामावलेला आहे.गुरुभक्ती हीच सर्वात मोठी साधना असून,सद्गुरूंचे चरण हेच संसाररूपी सागर पार करण्याचे साधन असल्याचेही महाराज म्हणाले. याप्रसंगी आमदार काशिनाथ दाते यांच्या पत्नी सुमन दाते, खासदार निलेश लंके यांचे बंधू दिपक लंके, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, तालुका कार्याध्यक्ष सोमनाथ वरखडे आदी उपस्थित होते. किर्तन श्रवणासाठी मोठ्या संख्येने भाविकभक्त उपस्थित होते.

# लेक सासरी जाताना घोड्यावरून मिरवणूक, देवदर्शन आणि वृक्षारोपणातून नवा आदर्श

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

बाबूर्डी (ता. श्रीगोंदा) येथील प्रगतिशील शेतकरी श्री भास्कर बबन शिर्के यांनी आपल्या मुलीच्या विवाह सोहळ्यातून सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश दिला. त्यांची कन्या हर्षदा हिचा विवाह २२ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. लग्नापूर्वी गावातील देवतांचे दर्शन घेण्याच्या पारंपरिक प्रथेनुसार हर्षदा हिची घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. यानंतर सासरी जाताना तिच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धनाचा आदर्श उपक्रम राबविण्यात आला.



वृक्षप्रेमी आणि अभ्यासू शेतकरी म्हणून परिचित असलेल्या श्री शिर्के यांनी यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या आईच्या वर्षश्राद्धानिमित्त उपस्थितांना केसर आंब्याची रोपे वाटप करण्यात आली होती. त्या रोपांपैकी अनेक झाडांना आज गोड आंब्यांची फळे लागली आहेत. वाढदिवस किंवा इतर समारंभात वृक्ष भेट देणे, धार्मिक पुस्तके वाटप करणे, तसेच गावातील शाळांना शैक्षणिक साहित्य देणे हे त्यांचे आवडीचे कार्य आहे. दातृत्व जपणारे "भास्कर भाऊ" म्हणून ते पंचक्रोशीत परिचित आहेत. मढे वडगाव, म्हातारपिंप्री व श्रीगोंदा परिसरात त्यांचा मोठा मित्रपरिवार असून शिक्षणाविषयी त्यांना विशेष जिव्हाळा आहे. शास्त्र शाखेचे पदवीधर असलेल्या शिर्के यांची मुलेही उच्च शिक्षित आहेत. स्थानिक शिक्षकांच्या मते, त्यांनी अनेक वेळा शाळेला आर्थिक व साहित्यिक मदत केली आहे. नवी वधू हर्षदा हिनेही आपल्या पहिल्या पगारातून शाळेच्या इमारत निधीसाठी योगदान देत सामाजिक भान जपले आहे. मिरवणुकीदरम्यान गावातील सर्व देवतांचे दर्शन घेण्यात आले. तसेच गावच्या चौकात छत्रपती शिवाजी महाराजांची आरती करून अभिवादन करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन मुलगा चि. प्रतीक शिर्के यांनी केले.

# डिंगोरे येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ संचालित पुष्पावती विद्यालय,डिंगोरे येथे आज राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या निमित्ताने विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून विविध विज्ञान प्रयोग व उपकरणांचे आकर्षक सादरीकरण केले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाविषयीची माहिती उपस्थितांना सांगितली. कार्यक्रमात क. अनुराधा नरवडे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व विशद करत रमण इफेक्ट या प्रयोगाबाबत सविस्तर माहिती दिली.त्यांनी या शोधाचे विविध क्षेत्रांतील उपयोग उदाहरणांसह स्पष्ट केले. यासोबतच डॉ.सी. व्ही.रमण यांना मिळालेल्या नोबेल पारितोषिकाची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेला विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख साधना तांबे यांनी केले,तर आभार प्रदर्शन शिक्षक प्रतिनिधी वैभव देशमुख यांनी मानले.संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन विज्ञान शिक्षक रतिलाल बागुल यांनी केले.

कार्यक्रमप्रसंगी दीपा सावंत, मंगेश कोंढार, किसन भुतांबरे, मंगेश डुंबरे,शिवाजी उकिरडे, जगन्नाथ गाढवे,श्रीमती कोल्हार आदी मान्यवर उपस्थित होते.

# य राष्ट्रध्वजाचा अवमान व अपमान

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगर परिषद येथील कार्यालयात मुख्याधिकारी चरण सहदेव कोल्हे , नगरपालिकेचे कर्मचारी दत्तात्रय बाजीराव मुंढे व कर्मचारी रेश्मा बाळासाहेब नाईकवाडी इतर कर्मचारी यांनी भारतीय राष्ट्रध्वजाचा अवमान , अपमान , अनादर व कर्तव्यात कसूर केल्याबाबत या दोषीवर राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंधक कायदा १९७१ चे कलम २ प्रमाणे जुन्नर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची मागणी जुन्नर प्रेस क्लब उपाध्यक्ष अमोल मनोहर गायकवाड यांनी लेखी स्वरूपात मागणी केली आहे . त्याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , ६ सप्टेंबर २०२५ गणपती विसर्जन रोजी जुन्नर नगरपालिका पहिल्या मजल्यावर रात्रीचे ८ वा . नगराध्यक्ष यांच्या दलनामध्ये भारतीय राष्ट्रध्वज टेबल वरती पसरून त्यावर जेवणाचे डबे व जेवणाचे पाकीट त्या ठिकाणी जिलेबी व इतर पदार्थ देखील ठेवलेले होते.

# उपमहापौरांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य सेवांचा आढावा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शहरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व दर्जेदार करण्याच्या उद्देशाने उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस अति. आयुक्त पवनीत कौर, आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोऱाडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे, परिमंडळ वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक पखाले, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेमलता घाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गुणेश बागडे तसेच विद्युत व भवन विभागाचे अभियंते आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील विविध महापालिका रुग्णालयांमधील प्रलंबित कामे, सेवा विस्तार, आवश्यक दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आरोग्य सेवा अधिक परिणामकारक



### रुग्णालयांना तात्काळ प्रत्यक्ष भेट

करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालय हे संपूर्णपणे महापालिकेमार्फत चालवून अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कै. द्रोपदाबाई मुरलीधर खेडेकर रुग्णालय येथे डोळे व दंत उपचार सुविधा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले.

औंध रोडवरील कै. बाबुराव गेनबा शेवाळे रुग्णालय या इमारतीचा संपूर्ण उपयोग करून आवश्यक देखभाल व दुरुस्ती करत आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचे ठरविण्यात आले. तसेच औंध कुटी रुग्णालय येथे नूतनीकरण करून पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याचे निर्देश देण्यात आले.

गोरगरिब व सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, परवडणारी व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून ठोस पावले उचलण्यात येत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

बैठकीनंतर उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी संबंधित विभागांना सर्व बाबींवर प्राधान्याने तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच दुपारी १.३० ते ३ या वेळेत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत वरील सर्व रुग्णालयांना प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन सुधारणा कामांना त्वरित प्रारंभ करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

# भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थीनीं स्पर्धा परिक्षेत सहभागी व्हावे : गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थीनी आतापासूनच स्पर्धा परिक्षेत सहभागी होऊन भाग घ्यायला हवे असे आवाहन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेडचे सुधीर गुट्टे यांनी जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे आयोजित एन.एन.एम.एस. परिक्षेत उत्तीर्ण विध्यार्थी सत्कार सोहळा प्रसंगी केले. जिल्हा परिषद हायस्कूल येथे दि २८ फेब्रुवारी रोजी,भारतात दरवर्षी दि २८ फेब्रुवारी रोजी "राष्ट्रीय विज्ञान दिन" साजरा केला जातो २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिक शास्त्रज्ञ प्रो.सी.व्ही. रमन यांनी रमन इफेक्ट या शोधाची घोषणा केली होती. यासाठी त्यांना १९३० मध्ये भारतात पहिले नोबल पारितोषिक मिळाले. वैज्ञानिक जागरूकता वाढवण्यासाठी आणि विज्ञानाचे महत्त्व सांगण्या साठी, हा दिवस साजरा केला जातो.




पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी या शाळेसाठी या वर्षीच्या विज्ञान दिन विशेष होता. शाळेतील इयत्ता आठवीच्या ५७ पैकी ४५ विद्यार्थ्यांनी एन. एन.एम.एस म्हणजेच (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षा ) या परीक्षेत घवघवीत यश मिळून शाळेच्या आणि गावाचं नाव लौकिक केल्या बद्दल विज्ञान दिनाचे औचित्य साधून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या सोहळ्याला सुधीर गुट्टे गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड यांची विशेष उपस्थिती होती, यावेळी शालेय जीवनातील शिष्यवृत्ती परीक्षा आणि एन.एन. एम.एस सारख्या परीक्षा म्हणजे यु.पी.एस.सी आणि एम.पी.एस.सी परीक्षांच्या पाया आहे. जर भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी आतापासूनच अशा प्रकारच्या स्पर्धा परीक्षां मध्ये भाग घ्यायलाच पाहिजे असा संदेश शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना देऊन परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाला काळेश्वर संस्थानचे सचिव शंकर हंबर्डे,सरपंच सौ.संध्याताई विलास हंबर्डे, पालक प्रतिनिधी,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राजेश बालाजी हंबर्डे,भास्कर हंबर्डे,शिलानंद सोनकांबळे, गावातील प्रतिष्ठित नागरिक व शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे,केंद्रप्रमुख विकास मोरे,विषय तज्ञ मारुती ढगे , सामाजिक कार्यकर्ते भास्कर हंबर्डे, पत्रकार रमेश ठाकूर,यांची विशेष उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप विष्णुपुरी गावातील तंटामुक्तीचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिक हंबर्डे यांनी परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून या सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेसाठी तयार करणारे शाळेतील शिक्षक संतोष देशमुख,आनंद वळगे,विकास दिग्रसकर,धनंजय न्यामलवार,व सहभागी सर्व शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

# पुण्याच्या दोघांनी शेतकऱ्याला लुटले

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

चारचाकी थार गाडी स्वस्तात मिळवून देतो असे आमिष दाखवून अर्धापूर येथील एका शेतकऱ्याची ४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पुण्यातील दोन एजंटांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, बोगस चेक देऊन फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. अर्धापूर येथील तक्रारदार शेतकरी यांना चारचाकी गाडी घेण्यासाठी त्यांनी जुन्या गाड्यांचे खरेदी-विक्री करणारे एजंट प्रफुल प्रभाकर उबाळे आणि नारायण रामलू रामदीनवार दोघे रा. ईशा एम्पायर, चिंतामणी नगर, पुणे यांच्याशी संपर्क साधला. आरोपींनी व्हॉट्सअॅपवर गाड्यांचे फोटो पाठवून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला व ऍडव्हान्स म्हणून २५,१५० रुपये फोनपे द्वारे घेतले.

# ६४९वी जयंती उत्साहात साजरी

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ तालुका अर्धापूरच्या वतीने संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ नेते धर्मराज देशमुख,नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख, राष्ट्रीय चर्मकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, संभाजी वाघमारे, संजय सोनटक्के,के. के. गंगासागरे, जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड, जिल्हाध्यक्ष संदीप गोरे,युवा अध्यक्ष रवी गंगासागरे आदी मान्यवर उपस्थिती होते. संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकत, त्यांचे समतेचे आणि




मानवतेचे विचार समाजासाठी आजही कसे मार्गदर्शक असल्याचे उपस्थित मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुकाध्यक्ष बालाजी गंगासागरे, उपाध्यक्ष संतोष वाघमारे, गोविंद माऊली पार्डीकर, शिवाजीराव सोनटक्के, तानाजी सोनटक्के, शहराध्यक्ष रवी साखरे, पुंजाजी विनकरे, युवा उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी कचरू जोगदंड, होनाजी जोगदंड, केशव जोगदंड, गणेश विनकरे, बालाजी सोनटक्के, सुनील पतंगे, रोहिले सर, अरविंद सोनटक्के, मारुती सोनटक्के, केशव सोनटक्के, प्रभाकर साखरे, बाळू शेवाळे, सुनील साखरे, लक्ष्मण साखरे, गजानन साखरे, सचिन गंगासागरे, गजू करोव यांच्यासह चर्मकार समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आंतरराष्ट्रीय परिषद (IALS–2026) चा समारोप उत्साहात

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जैवशास्त्रातील नवोन्मेष व उपयोजन या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद (IALS–2026) चा समारोप दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामधील जैवशास्त्र संकुल येथे उत्साहात पार पडला. ही परिषद नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे आणि पीएम - उषा (PM-USHA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. समारोप समारंभात मा. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक गिरी उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन यांनी वाहकजन्य रोग आणि वाढती प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही जागतिक पातळीवरील गंभीर आव्हाने असल्याचे नमूद केले. या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी बहुविद्याशाखीय व आंतरविद्याशाखीय संशोधनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. समाजाभिमुख आणि लोककल्याणकारी संशोधनाला प्राधान्य देण्याचे आवाहनही त्यांनी केले. परिषदेमध्ये देश-विदेशातील तज्ज्ञांनी सहभाग नोंदवून जैवशास्त्रातील नवकल्पना, संशोधनाची दिशा आणि उपयोजन यावर सखोल चर्चा केली.

# नाशिक महापालिका भरतीत स्थानिकांना प्राधान्य द्या

### आमदारांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिकेमार्फत सुरू असलेल्या भरती प्रक्रियेमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यासाठी 'नाशिक डोमिसाइल प्रमाणपत्र' अनिवार्य करण्याची ठाम मागणी आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे आणि आमदार सरोज अहिरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. विधान भवन येथे झालेल्या भेटीत त्यांनी या संदर्भातील सविस्तर निवेदन सादर करून तात्काळ कार्यवाहीची मागणी केली.

नाशिक महानगरपालिके मार्फत आभियांत्रिकी संवर्गातील पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. नाशिक हे झपाट्याने विकसित होणारे शहर असून येथील अनेक

> नाशिक महानगरपालिकेत विविध पदे रिक्त आहे. सिंहस्थ कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर आभियांत्रिकी संवर्गातील पद भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यासाठी टीसीएस मार्फत राबविण्यात यावी तसेच या भरती प्रक्रियेत स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. महापालिकेच्या नगरसेवकांनीही स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी आग्रही भूमिका घेणेही आवश्यक आहे.
>
> **- आमदार देवयानी फरांदे**

युवक-युवतींनी तांत्रिक शिक्षण घेऊन आवश्यक पात्रता प्राप्त केली आहे. मात्र भरती प्रक्रियेत स्थानिकांना न्याय मिळावा, यासाठी विशेष धोरणाची आवश्यकता असल्याचे आमदारांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. आमदार देवयानी फरांदे यांनी सांगितले की, नाशिक शहरातील पायाभूत सुविधा, नागरी समस्या, भौगोलिक परिस्थिती आणि नागरिकांच्या गरजा यांची सखोल माहिती स्थानिक अभियंत्यांना असते. त्यामुळे स्थानिक प्रशासन अधिक परिणामकारक आणि जबाबदारीने कार्य करू शकते. पदभरती करतांना नाशिक जिल्ह्यात किमान १५ वर्षे वास्तव्य असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्याची अट समाविष्ट करण्याची मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. या निर्णयामुळे



नाशिकमधील बेरोजगार तरुणांना मोठा दिलासा मिळेल तसेच शहराच्या विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास तिन्ही आमदारांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागाशी चर्चा करून आवश्यक त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले.

स्थानिकांना प्राधान्य देतांना 'नाशिक डोमिसाइल प्रमाणपत्र' अनिवार्य करण्याची मागणी यावेळी मुख्यमंत्रयांकडे करण्यात आली. नाशिकमधून दरवर्षी अनेक तरूण तरूणी उच्च शिक्षण घेतात. भौगोलिक परिस्थिती आणि नागरिकांच्या गरजा यांची सखोल माहिती स्थानिक अभियंत्यांना असते. त्यामुळे स्थानिक प्रशासन अधिक परिणामकारक आणि जबाबदारीने कार्य करू शकते. यामुळे नाशिकच्या तरूणांना बेरोजगार उपलब्ध होईल अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

# शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण; पर्यटकांमध्ये उत्साह

(समर्थ गांवकरी)

मिनी काश्मीर सापुतारा येथे गेल्या दोन दिवसांपासून हवामानात अचानक बदल पाहायला मिळत आहे. पहाटेपासून संपूर्ण डोंगररांगांमध्ये दाट धुके पसरल्याने पुन्हा एकदा थंडीची चाहूल लागली असून परिसराचे नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. शनिवारी सकाळी गिरीकंदरा, सर्पगंगा तलाव परिसर तसेच मुख्य मार्गांवर धुक्याची पांढरी चादर पसरल्याने वाहनचालकांना सावधगिरीने आणि संथ गतीने वाहन चालवावे लागले.



धुके आणि गार वाऱ्यांमुळे सापुताऱ्यात आल्हाददायक व रोमँटिक वातावरण निर्माण झाले असून सेल्फी पॉइंट आणि विविध व्ह्यू पॉइंटवर पर्यटक निसर्गरम्य दृश्यांचा आनंद घेताना दिसून आले. प्रसिद्ध पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या सापुताऱ्यात हवामानातील या बदलामुळे हॉटेल आणि पर्यटन व्यवसायाशी संबंधित व्यापाऱ्यांमध्येही समाधानाची भावना व्यक्त होत आहे. येत्या काही दिवसांत पर्यटकांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.मात्र दुसरीकडे, हवामानातील या अचानक बदलामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या काळात वाढलेली आर्द्रता आणि थंडावा उभ्या पिकांवर विपरीत परिणाम करू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः भाजीपाला आणि बागायती पिकांना नुकसान होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत. हवामानातील असे अचानक बदल जरी निसर्गसौंदर्याला नवा रंग देत असले, तरी शेतीप्रधान भागात शेतकऱ्यांची चिंता वाढवणारे ठरत असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे.




ठाणे : दिव्यातील आर. एल.पी. हायस्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शेकडो शालेय विद्यार्थ्यांनी सदर विज्ञान प्रदर्शनात आपला सहभाग घेऊन अनेक प्रोजेक्ट तयार करून प्रदर्शनात त्याची माहिती तसेच महत्व पटवून दिले. प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांसह अनेक पालकांनी देखीलआहे आपली उपस्थिती दर्शविली. सदर प्रदर्शनासाठी शिक्षकांकडून पालकांना व मुलांना उत्तम मार्गदर्शन करण्यात आले. प्रसंगी शाळेचे विश्वस्त राजेश पांडे सर, प्रमोद सर,संतोष सर, मनोज सर तसेच मुख्याध्यापिका , सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होते. (फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...




### दीपक नागपुरे अध्यक्षपदी तर विजय चाबुकस्वार सेक्रेटरीपदी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : ऑल इंडिया पोस्टल एस सी एस टी वेल्फेअर असोसिएशनचे तिसरे अधिवेशन अहिल्यानगर येथे संपन्न झाले.या अधिवेशना मध्ये पुढील दोन वर्षाकरिता कार्यकारणीची निवड करण्यात आली.दीपक यशवंत नागपुरे यांची अध्यक्षपदी तर विजय चाबुकस्वार यांची सेक्रेटरी पदी नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. इतर कार्यकारणी पुढील प्रमाणे कार्यकारी अध्यक्षपदी अश्विनी चिंतामणी,किरण शिंदे,प्रदीप सूर्यवंशी व दीपक कुंभारे,डेप्युटी सेक्रेटरी अमोल साबळे, खजिनदार महेश सदाफुले,असिस्टंट सेक्रेटरी हर्ष कांबळे,भावना कदम व पूजा सिन्नरकर,ज्योती कांबळे ऑर्गनायझेशन सेक्रेटरी,सीमा साळवे असिस्टंट सेक्रेटरी,सुभाष बर्डे,सुरज खंडागळे,बाबासाहेब शितोळे,अजय आगळे,सारिका साळवे,जय मडावी,अर्जुन जटाळे , दीपक भुसारी,संदीप मिसाळ, शैलेश राहींज,अश्विनी फुलकर,राहुल साबळे यांची सर्वांची सर्वानुमते कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. अधिवेशना करिता महाराष्ट्र राज्यातून अनेक मान्यवर व सभासद उपस्थित होते अधिवेशनात करिता खा.निलेश लंके उपस्थित होते आपल्या भाषणात त्यांनी पोस्ट कर्मचाऱ्यांच्या समस्या विषयी व सुख सोयी विषयी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले,सभेच्या अध्यक्ष स्थानी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सीनियर पोस्ट मास्तर आदरणीय सुरेश जी बनसोडे होते.

### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यालयात ग्रंथदिंडीचे आयोजन



पाथर्डी (स. गांवकरी) : मराठी ज्येष्ठ कवी साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन याचे औचित्य साधून श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी येथे संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथदिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या ग्रंथदिंडीमध्ये विद्यालयातील ७३६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या ग्रंथदिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध फलकांतून वाचनाचे महत्त्व पटवून दिले तसेच विविध ग्रंथांचे पूजन यावेळी करण्यात आले. ग्रंथदिंडी, विविध संतांची वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी,झेंडे,फलक घेतलेले विद्यार्थी यामुळे विद्यालयातील वातावरण अतिशय उत्साही व आनंददायी बनले. ग्रंथदिंडीचे उद्घाटन ग्रंथपाल प्रा.अशोक वैद्य, ग्रंथपाल प्रा. किरण गुलदगड,मुख्याध्यापक शरद मेढे,समन्वयक ज्ञानेश्वर गायके, ग्रंथपाल नंदकुमार झेंड, संपत घारे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. मराठी भाषा ही केवळ आपली मातृभाषा नसून ती आपली संस्कृती आणि ओळख आहे.आजच्या डिजिटल युगातही विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी या उद्देशाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यालयात गीत गायन स्पर्धा,प्रश्नमंजुषा स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. गीत गायन स्पर्धेत 35 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कविता, पोवाडे,भारुडे, शेतकरी गीत, देशभक्ती गीत सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके यांनी केले.सूत्रसंचालन शितल आंधळे यांनी तर आभार गार्गी तरवडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेश्मा सातपुते, दादासाहेब उदमले,दीपक राठोड, शशांक महाजन,प्रमोद हंडाळ, अर्चना धायतडक, रत्नमाला सांगळे, अनिता केदार, जयश्री खोरदे, सुवर्णा ढाकणे, उषा आव्हाड,सतीश बोरुडे यांनी परिश्रम घेतले.

# पुरवणी मागण्यांवर आमदार काशिनाथ दाते यांचा घणाघात

- दुर्गम शाळा, जलजीवन योजना, क्रीडा संकुल आणि दिव्यांगांच्या हक्कांसाठी सभागृहात आवाज

पारनेर : (समर्थ गांवकरी)




शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ सन २०२५–२६ च्या पुरवणी मागण्यांवर झालेल्या चर्चेत पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी शिक्षण, क्रीडा, पाणीपुरवठा आणि दिव्यांग कल्याण या महत्त्वाच्या विषयांवर ठोस आणि अभ्यासपूर्ण मांडणी करत सरकारचे लक्ष वेधले.

जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांची वास्तविक परिस्थिती मांडताना आमदार दाते म्हणाले की, पारनेर मतदारसंघातील अनेक वस्ती शाळांमध्ये आजही मूलभूत भौतिक सुविधा नाहीत. स्वच्छतागृह आहेत; परंतु पाण्याअभावी ती कायम अस्वच्छ राहतात. क्रीडांगणे अपुरी आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर या सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांबाबत संच मान्यता रद्द करण्याचा विचार होऊ नये, अशी ठाम भूमिका घेत त्यांनी ही मर्यादा २० ऐवजी १५ करावी, अन्यथा दुर्गम भागातील गरीब व शेतकरी कुटुंबांची मुले शिक्षणापासून वंचित राहतील, असा इशारा दिला. एआयच्या युगात ग्रामीण शाळांनाही इंटरॲक्टिव्ह बोर्ड द्या खाजगी शाळांशी स्पर्धा करताना जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी एआयच्या युगात किमान इंटरॲक्टिव्ह बोर्डसारख्या सुविधा सर्व शाळांमध्ये उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. सध्या ५० टक्क्यांहून अधिक शाळा या सुविधांपासून वंचित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. पोषण आहाराच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह, पोषण आहारासाठी भरीव तरतूद झाली असली तरी प्रत्यक्षात मिळणारा आहार निकृष्ट दर्जाचा असल्याची तक्रार करत त्याची नियमित तपासणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करावी, अशी मागणी आमदार दाते यांनी केली. "मुलं अर्धा भात फेकून देतात; हा अपव्यय थांबवण्यासाठी गुणवत्तेची हमी आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. पारनेर येथील २० वर्षांपूर्वी उभारलेल्या क्रीडा संकुलाची दुरवस्था मांडताना त्यांनी सांगितले की, जॉगिंग ट्रॅक, बॅडमिंटन हॉल यांसारख्या सुविधा जीर्ण झाल्या आहेत. साडेतीन कोटी रुपयांचा दुरुस्ती प्रस्ताव प्रलंबित असून राज्य क्रीडा समितीची बैठक लवकर घेऊन त्यावर निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. जलजीवन मिशनअंतर्गत पारनेर मतदारसंघात ८३ योजना मंजूर झाल्या; त्यापैकी केवळ २९ पूर्ण झाल्या असून उर्वरित ५४ योजना अपूर्ण अवस्थेत आहेत, असे सांगत आमदार दाते यांनी योजनेचा सखोल आढावा घेऊन तातडीने निधी उपलब्ध करून कामे पूर्ण करावीत, अशी मागणी केली.

# आपटाळे येथे प्रत्येकी ३ शाळांना संगणक संचांचे वाटप

पालघर : (समर्थ गांवकरी)



दि. २७ 'मराठी भाषा गौरव दिना'चे औचित्य साधून सुनील भुसारा यांच्या संकल्पनेतून आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जव्हार तालुक्याच्या वतीने ग्रामपंचायत आपटाळे हद्दीतील प्रत्येकी ३ जिल्हा परिषद शाळांना संगणक संचांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन तालुका अध्यक्ष तथा कोरतड सावरपाडा ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप माळी यांच्या हस्ते झाले. ॲड. संजय रानडा यांच्या संयोजनातून आपटाळे, कापरिचापाडा आणि गंगापूर येथील प्रत्येकी एका जिल्हा परिषद शाळेला संगणक संच देण्यात आला. यावेळी तालुका युवक अध्यक्ष विनोद मौळे, आदिवासी सेल तालुका अध्यक्ष संजय भला, विद्यार्थी सेल प्रमुख राहुल घेगड, उपाध्यक्ष नरेश मुकणे, दीपक गावंढा, उपसरपंच सुभाष भोरे, तसेच मच्छिंद्र कोरडा, जितेंद्र डोके, संतोष गोविंद, रामदास तराळ, नानू गवळी, बाबू सुनाड, मोहन दखणे, काशिनाथ भोये, संतोष भला, रुपेश भोरे आदी उपस्थित होते. आपटाळे जिल्हा परिषद शाळेत संगणक वाटपाबरोबरच ढोलनाच पथक व 'डाक भक्ती' पथकाचा सत्कार करण्यात आला. आदिवासी सेलचे अध्यक्ष संजय भला यांनी आदिवासी समाजाच्या परंपरा, प्रथा आणि संस्कृती जपण्याचे आवाहन केले.

# मालमत्ता कर थकबाकीदारांवर महापालिकेची कारवाई

ठाणे: (समर्थ गांवकरी)




सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अंतिम टप्पा सुरू असताना ठाणे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने थकबाकीदारांविरोधात कठोर कारवाई सुरू केली आहे. अनेक करदात्यांनी वेळेत मालमत्ता कर भरून मनपेला सहकार्य केले असले तरी काही करदाते अद्याप थकबाकीदार आहेत. थकबाकीदारांवरील कारवाई अधिक कठोर व प्रभावी करण्याचे तसेच त्यांची नावे प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. सध्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अंतिम टप्पा सुरु असल्याने मालमत्ता करवसुलीची कारवाई महापालिकेकडून हाती घेण्यात आली आहे. याअंतर्गत थकीत करदात्यांना नोटीस, वॉरंट बजावून मिळकत जप्त करणे, जाहिर लिलावाद्वारे मिळकतीची विक्री करणे यासारखी कारवाई करुन मिळकत सील करण्याची कारवाई हाती घेण्यात आली आहे. अद्यापपर्यंत ५१३ मालमत्ता जप्त केल्या असून, २२३ मालमत्ता सील करण्यात आल्या व १२०६ थकबाकीदारांचा पाणीपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.करदात्यांना सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर भरणे सोयीचे व्हावे याकरिता सर्व प्रभाग स्तरावरील संकलन केंद्रे दि.३१.०३.२०२६ पर्यंत सर्व शनिवारी सकाळी १०.३० ते सायं. ४.३० तसेच सर्व रविवार सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत कर संकलनाकरीता कार्यान्वीत ठेवण्यांत आले आहेत. करदाते ठाणे मनपाच्या २१ संकलन केंद्रापैकी कोणत्याही संकलन केंद्रावर त्यांचा मालमत्ता कर जमा करु शकतात.

त्याचप्रमाणे करदाते www.propertytax.thanecity.gov.in या लिंकद्वारे तसेच GooglePay, Phonepe, Bhim App च्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरु शकतात.

# आनंदोत्सव ट्रस्टच्या विविध पुरस्कारांचे उत्साहात वितरण

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



आपल्या नगरमध्ये सामाजिक समरसतेचे चांगले वातावरण आहे. आशा चांगल्या वातावरणात समाज मात्र भरकटत चालल आहे अशी चिंता सर्वत्र व्यक्त होत आहे. पण दुसऱ्या बाजूने विचार केलातर अनेक चांगल्या घटनाही दररोज घडत आहेत. मात्र सकारात्मक पेक्षा नकारात्मक घटनांचीच जास्त चर्चा होते. त्यामुळे नागरिकांनी तसेच समाज माध्यमांनी जास्तीत जास्त सकारात्मक गोष्टींना प्राधान्य दिलेतर नकारात्मकता कमी होईल व समाजची चिंता करण्याची गरज पडणार नाही. यासाठी समाज पारीवार्तनासाठी चांगले काम करणाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे अवश्यक आहे. आनंदोत्सव ट्रस्टने समाजात चांगले काम करणाऱ्यांचा योग्य सन्मान केला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी केले.

नगरच्या सामाजिक, आध्यात्मिक व साहित्यिक क्षेत्रात काम करणाऱ्या आनंदोत्सव ट्रस्टच्या विविध पुरस्कारांचे वितरण प्रांत संघचालक नानासाहेब जाधव व लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग संस्थेचे कार्यकारी विश्वस्त प्रमोदभाई शिंदे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महर्षी अगस्तिमुनी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर, आनंदोत्सव ट्रस्टचे संस्थापक माजी प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे, सौ.उषा सहस्रबुद्धे आदींसह साहित्य, सामाजिक, आध्यात्मिक, शैक्षणिक क्षेत्रातिल नागरिक उपस्थित होते. या सोहळ्यात आनंदोत्सव ट्रस्टचा पहिला 'कृतार्थ दाम्पत्य जीवन गौरव' पुरस्कार प्रबोधनकार प्रा.मीरा पटारे व प्रा. भीमराज पटारे आणि डोंबिवली येथील प्रबोधनकार व मोरया प्रकाशनचे प्रकाशक दिलीप महाजन व सौ. सुरेखा महाजन यांना प्रदान करण्यात आले. 'शारदादुर्गा स्त्रीशक्ती गौरव पुरस्कार' पत्रकार शिल्पा रसाळ यांना व 'प्रज्ञावंत गौरव पुरस्कार' अकोले येथील ज्येष्ठ अभिवाचक, रंगकर्मी अनिल सोमणी यांना देण्यात आला. याच कार्यक्रमात वेदमूर्ती मोरेश्वरशास्त्री धर्माधिकारी व सौ. सुरेखा धर्माधिकारी तसेच श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाचे संयोजक डॉ. दिलीप धनेश्वर व वीणा धनेश्वर यांचाही अमृतमहोत्सवी वाटचालीसाठी विशेष सत्कार करण्यात आला. प्रमोदभाई शिंदे यांनी कृतार्थ दाम्पत्य जीवनवर भाष्य करताना सांगितले, अनेकांचे संसार उत्तमपणे पैलतीरावर गेले आहेत. आदर्श दाम्पत्य जीवनात अनेक गोष्टींची आवश्यकता असते. हे नव्या पिढीला सांगणे आवश्यक आहे. समजूतदार पणा, विश्वास, प्रेम, आपुलकी व समर्पण या प्रत्यक गोष्टीचे महत्व कृतार्थ व आदर्श दाम्पत्य जीवनात आहे. आनंदोत्सव ट्रस्टने दिलेला कृतार्थ दाम्पत्य पुरस्कार अशांनाच दिला आहे ज्यांनी एकमेकांसाठी त्याग, सुखदुःखात वाटेकरी, पारदर्शी जीवन जगात छोट्या छोट्या गोष्टींमध्ये समाधान मानले आहे. हे तरुण दाम्पत्यांनी लक्षात घ्यावे. यावेळी पत्रकार प्रकाश टाकळकर व कार्यक्रमाचे अध्यक्ष के.डी.धुमाळ यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात आनंदोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांनी पुरस्कारांच्या मागची भावना व्यक्त करून आनंदोत्सवच्या विविध अध्यामिक व साहित्यिक प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. प्रारंभी डॉ.स्वप्नील सहस्रबुद्धे यांनी संस्कृत भाषेतून सर्वांचे स्वागत केले. सौ. उषा सहस्रबुद्धे व डॉ.सोनिया सहस्रबुद्धे यांनी पुरसकार्थींच्या मानपत्रांचे वाचन केले.

यावेळी संजय खेले, गजेंद्र गाडगीळ, सुदाम देवखिळे, दादासाहेब वडवकर, ज्ञानेश्वर महापुरुष, उल्हास घोडके, गायत्री गाडगीळ, इंदुबाई खेडकर, सौ. वडवकर, सौ. देवखिळे,सुचित्रा भालेराव, प्रा. भांबरे, प्रकाश लासूरे, सुनिल सुसरे यांच्यासह श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग सामुहिक चिंतन महाप्रकल्पाच्या सर्व साधकांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी नियोजन केले.

# विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना दिशा देणारे : बाळासाहेब पोळ

## आल्हणवाडी शाळेत विज्ञान प्रदर्शन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा

पाथर्डी : (समर्थ गांवकरी)

दि.२८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आल्हणवाडी येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.विज्ञान प्रदर्शन व विविध उपक्रम हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना दिशा देणारे एक व्यासपीठ आहे, विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे काम झाले तरच उद्याच्या भारताचे उज्ज्वल भवितव्य व महासत्ता बनण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल व शासनाचा उद्देश सफल होईल, असे प्रतिपादन केंद्रप्रमुख श्री बाळासाहेब पोळ यांनी केले.

आल्हणवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विज्ञान प्रदर्शन व विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. सरस्वतीच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गव्हाणे, सरपंच परमेश्वर गव्हाणे, उपसरपंच योगिताताई कर्डिले, राधाकिसन कर्डिले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेचे शिक्षक श्री अरविंद चव्हाण यांनी कार्यक्रमाची रुपरेषा मांडून शाळेतील विविध उपक्रमांची माहिती करून दिली. आल्हणवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री किशोर मोरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. शासनाचा प्रदर्शन भरविण्याचा उद्देश स्पष्ट केला. तसेच त्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रदर्शनामध्ये पहिली दुसरीचा एक गट व तिसरी चौथीचा दुसरा गट अशा दोन गटामधून अनेक उपकरणाची मांडणी करण्यात आली होती. दिवसभर आल्हणवाडी येथील विविध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रदर्शन बघण्यासाठी रांगा लावल्या होत्या. या




कार्यक्रमानिमित्त माध्यमिक आश्रम शाळेची विद्यार्थिनी कुमारी प्रगती ढवणे हिची इस्त्रोसहलीसाठी निवड झाल्याबद्दल व श्वेता गायकवाड हिने विविध स्तरावर आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून गावाचं नावलौकिक वाढवल्याबद्दल दोघींचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आले. विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला तसेच सरपंच परमेश्वर गव्हाणे, उपसरपंच योगिता कर्डिले, माजी सरपंच राधाकिसन कर्डिले, शाळा समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गव्हाणे, सामाजिक कार्यकर्ते बाळू सत्रे व बंडू गव्हाणे यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला माध्यमिक शाळेचे सी.एम. फुंदे, सुरेश पवार, विठ्ठल गोल्हार, महेश वाघमोडे, गोपाल मोरे, वैशाली आठरे, ज्ञानेश्वर शिरसाट, न्यू इंग्लिश स्कूलचे बाळू फुंदे,सुनील ढोबळे व राऊत, पालक, ग्रामस्थ, आश्रम शाळा व न्यू इंग्लिश स्कूलचे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जि. प. शाळेच्या शिक्षिका श्रीमती सविता देखणे यांनी तर आभार शिक्षक नेते ज्ञानेश्वर शिरसाट यांनी मानले.

**टायटल व्हेरीफीकेशन नोटीस**

१) मिळकतीचे वर्णन तुकडी जिल्हा नाशिक तालुका इगतपुरी मौजे कुर्णोली येथील शेत मिळकत यांसी गट नं.८५ यांसी एकुण क्षेत्र हे ०४–४१ आर यांसी आकार रु. ०४.१५ पैसे यांमी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस प्रमाणे,
२) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत श्री मधुकर कचरु भोर यांचे मालकीचे क्षेत्र असून मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटला वरील मालकाचे नांव मालक व कब्जेदार सदर दाखल झालेले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे मिळकत मालकाने सांगितले आहे. सादर मिळकतीचे टायटल तपासण्याचे काम सुरु केलेले आहे. त्यासाठी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.
३) सदरील मिळकती बायत कुठलीही कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध जसे गहाण, दान, लिन, करारनामा, दावा, साठेखत, अन्न वस्त्र, मृत्युपत्र, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र अथवा कोणताही दस्तऐवज अथवा अन्य कोणताही प्रकारचा बोजा असल्यास अथवा लेखी व तोंडी करार अगर कोर्टाचा विषय या स्वरुपात गुंतलेली असल्यास त्यांना सदरहू नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आंत खालील पत्त्यावर पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्ययत तोंडी किंवा परस्पर वर्तमानपत्रातुन प्रसिध्द झालेल्या नोटीस अथवा हरकतींचा दखल घेतली जाणार नाही. तसेच मुदतीत हरकत न आल्यास मिळकत ही निर्वेध आहे असे समजण्यात येईल व मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत मिळकतीवर व आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
ही नोटीस
ता . २८/०२/२०२६
श्री मधुकर कचरु भोर जमिन मालकाचे नाव

रोहीत एम. उगले ॲड. व नोटरी
वाघेरे ता. इगतपुरी जि. नाशिक
आमचे तर्फे प्रसिध्दीस दिले. ९८५०४९७११६
ॲडव्हेकेट

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# स्त्रीजन्माचे स्वागत हीच खरी सामाजिक क्रांती : डॉ. सुधा कांकरिया

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**




स्त्री जन्माची घटती संख्या समाज पोखरून टाकत आहे.ही धग शहरी भागापासून ग्रामीण पर्यंत पोहचली आहे.आपण वेळीच जागे झालो नाही तर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर स्त्रीविना, आईविना या जगाचे वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही असे प्रतिपादन लेक वाचवा अभियानाच्या प्रेणेत्या डॉ.सुधा कांकरिया यांनी केले.जामखेड ग्रामीण रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस) प्रतिबंध कायदा १९९४ कार्यशाळेप्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी विचार मंचावर वैद्यकीय अधिक्षक डॉ.मनोजकुमार शिंदे, गट विकास अधिकारी शुभग जाधव, नगराध्यक्ष प्रांजल चिंतामणी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुनील बोरडे, जिल्हा रुग्णालय पी.सी.पी.एन.डी.टी. समन्वयक ऍड.सारिका सुरासे, सरपंच वैजयंती पाटील, सामाजिक कार्यकर्ते जयेश कांबळे, स्नेहालय जिल्हा समन्वयक योगेश अब्दुले, राहुल वासकर आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना त्या म्हंटल्या की;स्त्रीभ्रूणहत्येचे हे संकट इतके खोलवर रुजले आहे की त्याला भेदण्यासाठी स्त्रीजन्माच्या स्वागताचा विचार वेगवेगळ्या मार्गाने सातत्याने समाजमनावर बिंबवणे गरजेचे आहे.मुलगाच हवा हा अट्टाहास, मुलीला दुय्यम वागणूक, महिलांमध्ये असणारी आर्थिक, सामाजीक, शारीरिक असुरक्षितता, हुंडा पद्धती, मुलगी अविवाहित राहिल्यास कुटुंबाला कलंक आहे अशी भावना, गर्भलिंग निदानाची सहज व परवडण्याजोगी उपलब्धता, वैद्यकीय क्षेत्रातील ढासळलेली नैतिकता, महिलांचे बाजारीकरण, तिचे शोषण ही सामाजिक कीड आहे.म्हणूनच या विरुद्ध वज्रमुठ उभी करण्याची गरज आहे.सामाजिक बदल आणि परिवर्तन घडवत स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी परिसर अभ्यास, ठराव आणि अंमलबजावणी, कन्या जन्म आनंद सोहळा, मुलींना शिकवा सशक्त बनवा, लाखोपती योजना, पतसंस्था सोसायटी बँकेचा सहभाग, फक्त मुली असलेल्या परिवारांचा सन्मान करणे, मुलगीच आहे पणती दोन्ही घरी उजेड देती, नकोशी करूया हवीशी, आचरणातून संस्कार व युवा पिढीचा सहभाग, आठवा फेरा स्त्री जन्माच्या स्वागताचा, सामुदायिक डोहाळ जेवण, सोनोग्राफी मशीन शाप की वरदान, सामूहिक शपथ हा अकरा कलमी कृतिकार्यक्रम त्यांनी या कार्यशाळेत मांडला.संवेदनशील माणूस म्हणून स्त्रीभ्रूणहत्या टाळून सशक्त समाज बनवूया असेही त्या म्हणाल्या. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुनील बोराडे म्हणाले की;समाजमध्ये स्त्रीभ्रूणहत्या होणे हे कलंक आहे. स्वतःला प्रगत म्हणवला जाणाऱ्या समाजामध्ये हे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढत आहे.गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याच्या जागृतीसाठी सर्व पातळीवर अधिक काम करण्याची गरज आहे.लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविणेकरिता उपाययोजना ही काळाची गरज असे ते म्हणाले.यावेळी त्यांनी जामखेड तालुक्याचा आरोग्य आढावा देखील मांडला. यावेळी जिल्हा रुग्णालयच्या पी.सी.पी.एन. डी.टी समन्वयक ऍड.सारिका सुरासे म्हणल्या की;सामाजिक जबाबदारी स्वीकारून या कायदयाच्या प्रसाराससाठी, परिणामकारक अंमलबजावणीकरिता सजग राहूया. समुपदेशनाच्या विविध पातळीवर समाजामधील होत असलेल्या स्त्रीभ्रूणहत्या टाळण्यासाठी कायदयाचा धाक आणि त्यांची अंमलबजावणी असणे गरजेचे.

# रक्तदान शिबिरात ७० रक्तपिशव्यांचे संकलन

**नाशिक: (समर्थ गांवकरी)**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने कृषि विज्ञान केंद्राच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात ७० रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

कृषिविज्ञान केंद्राचे संस्थापक कार्यक्रम समन्वयक प्रा. का. य. सोनवणे यांचे स्मृतीपित्यर्थ गेल्या २५ वर्षांपासून दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे,प्र. कुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंह बिसेन यांच्याहस्ते या रक्तदान शिबिराचे उदघाटन झाले. यावेळी कृषिविज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. नितीन ठोके, माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे, डॉ. श्याम पाटील, हेमराज राजपूत, राजाराम पाटील, जनकल्याण रक्तकेंद्राचे अरुण कुलकर्णी आदी उपस्थित होते. कृषिविज्ञान केंद्रामार्फत चालवण्यात येणाऱ्या कृषि शिक्षण केंद्रातील विद्यार्थी, केंद्रातील शास्त्रज्ञ व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात रक्तदान केले. सुमारे ७० बाटल्यांचे संकलन या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आले. आजवर जवळपास एक हजाराहून अधिक बाटल्यांचे संकलन या विभागामार्फत करण्यात आले आहे. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे विविध उपक्रम राबविण्यात येतात. सामाजिक बांधिलकेतून सुरु असलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्वश्री डॉ. गिरीधर माने, प्रदीप देशमुख, जिग्नेश चौधरी, उमेश गाधले, वैष्णवी जाधव, अर्चना पवार, संदीप दळवी आदींचे सहकार्य लाभले.

# सप्ताह निमित्त मोफत आरोग्य शिबिर संपन्न



**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**

तलवाडा (ता. वैजापुर ) येथे धर्मवीर शौर्य प्रतिष्ठान व आनंद हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न झाले. येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहानिमीत शौर्य प्रतिष्ठानचे किशोर मगर यांनी डॉ. अमोल अन्नदाते यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद हॉस्पीटल वैजापूर मार्फत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या आरोग्य शिबिरात १७५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यामध्ये उच्च रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी, डोळे, ताप , सर्दी, खोकला आदींची मोफत तपासणी करण्यात आली.यावेळी धर्मवीर शौर्य प्रतिष्ठान तालुका प्रमुख किशोर मगर, आनंद मगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भगिनाथ मगर, पंचायत समितीचे मा . उपसभापती राजेंद्र मगर, माजी सरपंच भाऊसाहेब मगर, ह .भ .प . पुरुषोत्तम महाराज, रमेश फौजी, काशिनाथ मगर, आनंद हॉस्पीटलचे डॉ. वैभव गोरे, डॉ. शिवानी चौधरी, डॉ. अनिकेत शिरुळे, गोवर्धन करडे, अखंड हरिनाम सप्ताह कमिटीचे सर्व सदस्य, वारकरी व भाविक भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना पक्षाच्या पाठपुराव्याला यश

**जुन्नर: (समर्थ गांवकरी)**

शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केलेल्या मागणीला मोठे यश आले आहे. जुन्नर नगरपरिषदेच्या आगामी अर्थसंकल्पात गोशाळा प्रकल्पासाठी १ लाख रुपयांची विशेष आर्थिक तरतूद करण्यात आली असून, प्रशासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेतली आहे. जुन्नर शहर प्रमुख श्री. मयूर धनंजय रोकडे यांनी पत्राद्वारे नगरपरिषद प्रशासनाकडे आगामी अर्थसंकल्पात 'स्वयंपूर्ण गोशाळा प्रकल्प' उभारण्यासाठी निधीची मागणी केली होती. या पत्रात त्यांनी प्रामुख्याने खालील मुद्द्यांकडे लक्ष वेधले होते: रस्त्यांवरील मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात रोखणे. 'कचऱ्यातून संपत्ती' (Waste to Wealth) या संकल्पनेतून शेणापासून मोक्षकाष्ठ निर्मिती, सेंद्रिय खत विक्री आणि बायोगॅसद्वारे वीज बचत करणे.

# मराठी भाषा गौरव दिनी लोकसंस्कृतीच्या उपासकांचा सन्मान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालय येथे मराठी विभाग व संशोधन केंद्रात ' मराठी भाषा गौरव दिन"लोककलावंतांच्या, लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून,त्यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. लोककला या समाजाचा सांस्कृतिक वारसा,परंपरा आणि सामाजिक अस्मिता दर्शवतात. लोककला या समाजाचे प्रतिबिंब असल्याने त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. जागतीकीकरणाच्या युगात लोककला ही विविधतेची साक्ष देते.आणि मानवी सर्जनशीलतेचे प्रदर्शन करते. हे लोककलेचे महत्त्व मराठी भाषा गौरव दिनाच्या दिवशी लोक कलावंतांच्या प्रत्यक्ष सादरीकरणातून ठळकपणे मांडले गेले. कोपरगाव येथील छबुराव सुपेकर हे लोकपरंपरेतील पारंपरिक वासुदेव.या लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या कलेचा जागर 'मराठी भाषा गौरव दिना' च्या निमित्ताने करण्यात आला.

लोककलेचे अभ्यासक भगवान राऊत यांनी वासुदेव या लोकसंस्कृतीच्या उपासकाची व त्यांच्या लोककलेबद्दलची माहिती प्रत्यक्ष सादरीकरणातून विद्यार्थ्यांना सांगितली. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, कार्याध्यक्ष आणि पेमराज सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ.माहेश्वरी गावित होत्या.डॉ.गावित यांच्या नेतृत्वात महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. अध्यक्षीय भाषणात गावित म्हणाल्या,"बदललेल्या परिस्थितीत भाषेच्या संवर्धनासाठी जसे शासकीय पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे,तेवढेच जनतेनेही सहभाग दाखविणे गरजेचे आहे. मराठी भाषेत सकस संशोधन व्हावे. यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. काळाचे भान ठेवून मराठीचा अभ्यास जास्तीत जास्त व्यवहारोपयोगी करणेही आवश्यक आहे.समृद्ध अशा बोलींना टिकविणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.लोककला म्हणून उल्लेखित होणाऱ्या अनेक परंपरा लोकजीवन सारणीत आढळतात. लोककला हा सांस्कृतिक ठेवा आहे.तो जतन आणि संवर्धित करणे महत्त्वाचे आहे.

# उद्योजक मधुसूदन सारडा व करीमभाई हुंडेकरी यांचा सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



आदित्य बिर्ला समूहाची भारतामधील सर्वात मोठी सिमेंट उत्पादक कंपनी आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची अग्रगण्य कंपनी असलेल्या अल्ट्राटेक कंपनी सोबत गेल्या तब्बल ३५ वर्षांपासून निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्यरत असलेले मे.बी.झेड.सारडा फर्म चे उद्योजक मधुसूदन सारडा तसेच हुंडेकरी ट्रान्सपोर्टचे करीमभाई यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कंपनीचे नगर जिल्हा मार्केटिंग चे मुख्य नरेश कुमार गवई,पुणे विभागाचे लॉजिस्टिक चे मुख्य निखिल सिंग,तसेच मनोज पाटील,विरेंद्र साबळे,शुचित गुप्ता,पराग जोशी,रामप्रसाद मुथा, स्मिता सारडा आदींसह कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. ३५ वर्षांपूर्वी अहिल्यानगर परिसरात कंपनीची विक्री मर्यादित प्रमाणात होती.त्याकाळात उद्योजक मधुसूदन सारडा व करीमभाई हुंडेकरी यांनी चिकाटी,दूरदृष्टी आणि विश्वासार्ह सेवाभाव यांच्या बळावर कामाची भक्कम पायाभरणी केली.त्यांच्या अथक परिश्रमातून १२०डीलर्स व ८०० हून अधिक रिटेलर्सचे मजबूत जाळे उभे राहिले आहे. कंपनीच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांना "कंपनीचे दोन स्ट्रॉंग खांब" असा गौरवपूर्ण उल्लेख कंपनीचे अहिल्यानगर भागाचे मुख्य अधिकारी नरेश कुमार गवई यांनी केला. कंपनीची महिन्याची विक्री विक्रमी टनांपर्यंत पोहोचली.ही उल्लेखनीय कामगिरी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सहकार्य आणि योग्य नियोजन यांच्या पाठबळामुळेच शक्य झाली.अशी कृतज्ञ भावना मधूसुदन सारडा यांनी व्यक्त केली. शहरातील हुंडेकरी लॉन्स येथे अल्ट्राटेक कंपनीच्या सुमारे १५०० डीलर्स व रिटेलर्स यांचा स्नेह मेळावा संपन्न झाला. उद्योजक करीमभाई यांनी सर्वांना आवाहन केले की, आगामी काळात सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून दरमहा १ लाख मेट्रिक टन विक्रीचा टप्पा गाठण्याचा संकल्प करूया. कंपनीचे उच्च दर्जाचे सिमेंट धरणे, महामार्ग,मोठे पायाभूत प्रकल्प, नामांकित बांधकाम व्यावसायिक तसेच घरांच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. ओपीसी,पीपीसी तसेच इतर विविध सिमेंट प्रकारांद्वारे गुणवत्ता व विश्वास यांचे अधिष्ठान कायम राखले आहे.हा सन्मान त्यांच्या ३५ वर्षांच्या निर्दोष, समर्पित आणि प्रेरणादायी सेवेला दिलेली योग्य दाद आहे.

# राष्ट्रीय अस्मिता आणि समाजजागृतीचा दस्तऐवज

**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

पिंपळे सौदागर येथे शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सांस्कृतिक वार्तापत्र प्रकाशित "हिंदू जागरणाच्या १०० वर्षांची संघर्षयात्रा" या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभली. ग्रंथाचे प्रकाशन राष्ट्रीय स्वयंसेवक संघचे जिल्हा कार्यवाह मा. श्री. नरेंद्रजी पेंडसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थित म्हणून भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे उपस्थित होते. तसेच सांस्कृतिक वार्तापत्रचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत विक्री अधिकारी श्री. निखिल देविदास वझे यांनीही कार्यक्रमास हजेरी लावली.


# गणेश रेवगडे यांचे कर्जमाफी कृती समिती अध्यक्षांना पत्र

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

> कर्जमाफी योजना जाहीर करताना शासनाने सहकारी संस्थाचा विचार करावा



सध्या राज्यात कर्जमाफी संदर्भात लगबग सुरू आहे. कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्था आणि बॅक स्तरावरून माहिती चे संकलन चालू झाले आहे.शासणाच्या वतीने कर्जमाफी संदर्भात या.मुख्यमंत्री यांचे आर्थिक सल्लागार श्री परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली कृती समितीची स्थापना करण्यात आली असुन सदर समिती राज्यभरातील आढावा १ एप्रिल रोजी सादर करनार आहे.कर्जमाफीच्या बाबतीत शासनाने अजुन कुठलाही निकषांची स्पष्टता दिली नाही. परंतु राज्यातील सर्व प्रकारचे कर्जदार या माफीच्या लाभासाठी आशेवर बसले आहेत.परंतु हे असे जरी असले तर त्याचा थेट परिणाम सहकारी संस्था (सोसायटीवर) होनार आहे.या बाबतीत सहकारी सोसायटी च्या माध्यमातून प्राथमिक स्तरावरील शेतकरी अर्जदारांची भुमिका नेमकी काय आहे आणि त्याचा परिणाम संस्थेवर कसा होईल या सर्व गोष्टींचा आढावा म्हणून स्वाभिमानी सचिव संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे यांनी थेट कर्जमाफी कृती समिती अध्यक्ष यांना पत्रव्यवहार केला आहे.यात स्पष्ट भुमिका अशी घेतली आहे की, कर्जमाफी जाहीर होताना थकबाकी सभासदाबरोबर चालू बाकिदार सभासदांना देखील लाभ मिळावा. अन्यथा चालु बाकिदार सभासदांवर वेळोवेळी न मिळणार्या लाभा मुळे कर्ज न भरणाची मानसिकता झाली आहे.तसेच प्रती सभासद अमुक रकमेपर्यत कर्ज माफिची भुमिका असेल तर त्या रकमेवरील कर्ज भरण्याचा नियम असावा त्यामुळे जास्तीत जास्त सभासदांचा अर्तभाव योजनेत होईल.कर्जमाफी मध्ये पुनर्गठन केलेल्या भसासदांचा विचार व्हावा.या सर्व बाबींचा विचार शासनाने कर्जमाफी जाहीर करताना करावा.अन्यथा कर्जमाफी चा लाभ बाजुला राहील आणि सहकारी संस्था अडचणीत येतील. त्यामुळे शासनाने सभासदांना लाभ द्यावा परंतु सहकारी संस्था मोडकळीस येणार नाही याची काळजी घ्यावी असे मत गणेश रेवगडे यांनी मांडले आहे.याबाबद लवकरच मा.मुख्यमंत्री महोदय यांची भेट घेऊन चर्चा करनार असल्याचे अध्यक्ष गणेश रेवगडे यांनी सांगितले आहे.





# महापालिकेची 'अभय योजना' १ मार्चपासून लागू

**पिंपरी: (समर्थ गांवकरी)**

पिंपरी चिंचवड शहरातील थकबाकीदार नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाने १ मार्च २०२६ पासून 'अभय योजना' लागू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या योजनेअंतर्गत मालमत्ता कराच्या विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येणार आहे. ही योजना १ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर अभय योजना सुरू करण्याची मागणी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांकडे केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर प्रशासनाने ही योजना जाहीर केली आहे.

# पोदार प्रेप संगमनेरमध्ये 'सायन्स म्युझियम' थीमॅटिक टूर

## चिमुकल्यांनी अनुभवले विज्ञानाचे चमत्कार

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**




विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी आणि कल्पकता वाढवण्यासाठी पोदार प्रेप संगमनेर येथिल प्री- प्रायमरी विद्यार्थ्यांनकरिता 'थीमॅटिक टूर -सायन्स म्युझियम' हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध पैलूंची ओळख करून देणे आणि त्यांच्यातील कुतूहल जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमांतर्गत शाळेत विज्ञानाचे एक छोटेखानी संग्रहालय उभारण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी 'ज्वालामुखीचा उद्रेक' (Volcanic Eruption) कसा होतो, याचे प्रात्यक्षिक पाहिले. तसेच प्राचीन काळातील महाकाय 'डायनासोर' (Dinosaur) आणि त्यांच्या 'जीवाश्मांची' (Fossils) प्रतिकृती पाहून मुले थक्क झाली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना लाखो वर्षांपूर्वीच्या पृथ्वीवरील जीवसृष्टीची रंजक माहिती मिळाली. या उपक्रमात ज्वालामुखी आणि डायनासोर आकर्षणाचे केंद्र ठरले. या कार्यक्रमात 'ज्वालामुखीचा उद्रेक' (Volcanic Eruption) दर्शवणारी प्रतिकृती होती. बेकिंग सोडा आणि व्हिनेगरच्या मदतीने निर्माण केलेली ही प्रतिकृती पाहून मुले थक्क झाली. यासोबतच प्राचीन काळातील महाकाय 'डायनासोर' (Dinosaur) आणि त्यांच्या 'जीवाश्मांची' (Fossils) माहिती देणारे विशेष दालन उभारण्यात आले होते. डायनासोरचे अवशेष कसे सापडतात आणि ते कसे जतन केले जातात, हे मुलांनी मोठ्या आवडीने जाणून घेतले.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून हसत-खेळत

शिक्षण देण्यासाठी विविध 'सायन्स प्रयोगांचे' (Science Experiments) आयोजन करण्यात आले होते. हवेचा दाब, पाण्याचे गुणधर्म आणि रासायनिक अभिक्रिया अशा क्लिष्ट संकल्पना शिक्षकांनी प्रयोगांच्या माध्यमातून सोप्या करून सांगितल्या.

या विशेष दौऱ्यात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध साध्या पण रंजक प्रयोगांचा (Science Experiments) प्रत्यक्ष अनुभव घेतला. विज्ञानातील मूलभूत संकल्पना हसत-खेळत समजून घेताना मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. हा संपूर्ण उपक्रम पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या श्रीमती मीनाक्षी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. अशा उपक्रमामुळे मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यास मदत होते व त्यांच्या ज्ञानात भर पडते असेही त्यांनी सांगितले.

"मुलांच्या बालपणातच त्यांच्यात शोधक वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हा या थीमॅटिक टूरचा मुख्य उद्देश आहे," असे मत यावेळी पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ सोनल शुक्ला यांनी व्यक्त केले.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी पोदार प्रेपच्या सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले आणि पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. शाळेच्या या कल्पक उपक्रमाचे पालकांनी भरभरून कौतुक केले. मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी अशा प्रकारच्या 'थीमॅटिक टूर' अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

# एका पुतळ्याच्या निमित्तानं...

राजधानीतील ल्युटियन्स यांचा पुतळा हटवून तेथे राजाजी यांचा पुतळा बसवण्यात आला; पण भारताच्या राष्ट्रप्रमुखांसाठी याच ल्युटियन्सनं उभारलेल्या राष्ट्रपती भवनाला पर्याय शोधण्याचा विचार अद्याप तरी समोर आलेला नाही ! पुतळ्यांपेक्षा मूल्यं जपणं महत्त्वाचं, हा सांगावा ल्युटियन्स ते राजाजी या प्रवासानं दिलाय. राजधानीतल्या मुघल गार्डनला 'अमृत उद्यान' असं नाव देण्यात आलं, त्यापाठोपाठ राष्ट्रपती भवन परिसरातला ब्रिटिश वास्तुशिल्पकार एडविन ल्युटियन्स यांचा पुतळा हटवून त्या ठिकाणी स्वतंत्र भारताचे पहिले व एकमेव भारतीय गव्हर्नर-जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी उर्फ राजाजी यांचा पुतळा उभारण्यात आला. तिथून जेमतेम एका किलोमीटरवर किंग जॉर्जच्या नावाच्या रस्त्यालाही राजाजींचं नाव दिलं गेलं. या ताज्या घटनेकडे केवळ 'एक पुतळा गेला, दुसरा आला' असं वरवर पाहता येणार नाही. सार्वजनिक स्मृतीच्या केंद्रस्थानी कोण असावं, हा प्रश्न यातून पुन्हा ऐरणीवर येतो, या अंगानं या छोट्या वाटणाऱ्या घटनेकडं पहायला हवं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनातील अलीकडील इतर बदलांकडेही लक्ष वेधले, ज्यात ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या छायाचित्रांच्या जागी परमवीरचक्र विजेत्यांची छायाचित्रं लावणं यासारख्या निर्णयांचा समावेश आहे.

## संपादकीय



ल्युटियन्स यांचे पणतू, ब्रिटिश विज्ञान लेखक मॅट रिडले यांनी या बदलाबद्दल खंत व्यक्त करताना, त्यांच्या पणजोबांचं नाव पुतळ्याच्या पट्टीवरून आधीच काढून टाकण्यात आलं होतं, याकडेही लक्ष वेधलं. एखादा पुतळा हा त्या त्या देशाच्या सत्ता, स्मृती आणि मूल्यांचाही दृश्यमान पुरावा असतो. कोणत्याही राष्ट्रीय राजधानीच्या मध्यभागी कोणाचा पुतळा उभा आहे, त्यावर त्या त्या देशाच्या आत्मभानाचा उद्गार एका रीतीने ठरत असतो. केवळ तत्कालीन संसदेतले भव्य खांब जवळून पाहिले तरी ल्युटियन्स यांनी नवी दिल्लीची रचना करताना उभारलेल्या वास्तुशैलीच्या भव्यतेचा अंदाज येतो. ल्युटियन्स यांचा पुतळा हटवून त्याजागी राजाजींचा पुतळा उभारणं हा वसाहतवादी, गुलामगिरीच्या मानसिकतेला मूठमाती देण्याच्या प्रवासातील पुढचा अध्याय आहे, यात शंका नाही. पण त्या दृष्टीने



चेम्सफोर्ड, इरविन दाम्पत्य, कॅनिंग, फ्लॅग स्टाफ, मिंटो व त्यांच्याही आधीच्या औरंगजेबापासून (लेन) हुमायू, शाहजहान, अकबर आणि खुद्द बाबर आदींच्या नावाच्या खाणाखुणाही दिल्लीत बदलाची वाट पाहत असणार. बाबर हा फक्त आक्रमक होता. त्याच्या नावाने या देशात एकही गल्ली, रस्ता, गाव नसावं, हा खुद्द राममनोहर लोहियांचा विचार होता. इथे मुद्दा वेगळा आहे. नाव बदललं तरी दिल्लीच्या एपीजे अब्दुल कलाम रस्त्यावरची अतिक्रमणं, फेरीवाले पूर्ण हटले का? त्या रस्त्यावरच्या दैनंदिन जीवनातील समस्या दूर झाल्या का? नसेल तर एखादं ठिकाण नावापुरतंच 'प्रेरणास्थळ' बनण्याची शक्यता जास्त. पुतळे बदलले की मानसिकता बदलते का, हा यानिमित्तानं पुन्हा समोर आलेला प्रश्न. कुसुमाग्रजांच्या 'पाच पुतळे' या कवितेत पुतळ्यांचं चित्रण आधुनिक लोकशाहीतल्या मतपेढ्या आणि सत्तेची रूपकं असंही केल्याचं दिसतं. ज्यांचे पुतळे उभे केले.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ८१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 1 | 2 | 3 | 6 | 5 | 9 | 7 |
| 6 | 9 | 2 | 1 | 5 | 7 | 3 | 4 | 8 |
| 5 | 3 | 7 | 9 | 8 | 4 | 2 | 1 | 6 |
| 3 | 8 | 5 | 4 | 7 | 9 | 1 | 6 | 2 |
| 7 | 6 | 4 | 3 | 2 | 1 | 9 | 8 | 5 |
| 2 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 4 | 7 | 3 |
| 9 | 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 5 | 4 |
| 1 | 2 | 8 | 6 | 4 | 5 | 7 | 3 | 9 |
| 4 | 5 | 6 | 7 | 9 | 3 | 8 | 2 | 1 |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ८९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 4 | 6 | 2 | 8 | 7 | 3 | 5 |
| 3 | 2 | 8 | 7 | 5 | 9 | 6 | 4 | 1 |
| 7 | 6 | 5 | 1 | 4 | 3 | 2 | 9 | 8 |
| 5 | 7 | 3 | 9 | 8 | 4 | 1 | 2 | 6 |
| 4 | 1 | 9 | 2 | 6 | 5 | 8 | 7 | 3 |
| 6 | 8 | 2 | 3 | 7 | 1 | 9 | 5 | 4 |
| 2 | 5 | 1 | 8 | 3 | 7 | 4 | 6 | 9 |
| 9 | 3 | 7 | 4 | 1 | 6 | 5 | 8 | 2 |
| 8 | 4 | 6 | 5 | 9 | 2 | 3 | 1 | 7 |

उत्तर उद्याच्या अंकात

| पंचांग | संवत्सर – विश्वावसूनाम | १९:०९:२८ |
|---|---|---|
| १ मार्च २०२६ | अयन– उत्तरायणारंभ | नक्षत्र:पुष्य ०८:३४:०१ |
| रविवार | मास– फाल्गुन | योग:शोभन १४:३२:२४ |
| विक्रम संवत्– २०८२ | ऋतु– सौर वसंत | करण:कौलव ०७:५४:१३ |
| फाल्गुन शके | शुक्ल पक्ष | करण:तैतिल १९:०९:२८ |
| संवत्– १९४७ | तिथि:त्रयोदशी | करण:गर ३०:२९:४९+ |

## उपदेशाचे डोस

### संकटांना तोंड द्या!

भारत भ्रमणाच्या काळात स्वामी विवेकानंद वाराणशीत आले असताना घडलेला हा प्रसंग. दुर्गामातेचे दर्शन घेऊन स्वामीजी परत चालले होते. रस्त्याच्या एका बाजूला पाण्याचा तलाव होता आणि दुसरीकडे एक उंच भिंत होती. स्वामीजी त्या रस्त्याने थोडे पुढे गेले तोच वानरांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. वाराणशीची वानरे दांडगट असतात. स्वामीजी घाबरून पळू लागले पण वानरे आणखी वेगाने त्यांच्या मागे लागली. त्यांच्या पायात आडवी येऊ लागली. चावे घेण्याचा प्रयत्न करू लागली. स्वामीजी पुरते गांगरले. रस्त्याच्या बाजूला बसलेल्या एका साधूने हा प्रकार पाहिला आणि तो स्वामीजींना ओरडून म्हणाला, पळू नका, वानरांकडे तोंड करा! त्यांचे म्हणणे ऐकून स्वामीजी उलटे फिरले आणि वानरांकडे तोंड करून उभे राहिले. त्याबरोबर ती वानरे घाबरून एकदम मागे सरली आणि नंतर पळून गेली. पुढे न्यूयॉर्कमध्ये एका सभेत स्वामीजींना हा प्रसंग सांगितला आणि मग ते म्हणाले, या प्रसंगातून मी आयुष्यातला एक फार मोठा धडा शिकलो, तो म्हणजे संकटांपासून पळून जायचे नाही तर त्यांना तोंड द्यायचे, त्यांच्याशी सामना करायचा?

कथा उपदेश : संकटाला घाबरून न जाता त्याच्याशी सामना करायला शिकले पाहिजे.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ८६ – लुसियस कोर्नेलियस सुलाच्या नेतृत्वाखाली रोमन सैन्य अथेन्समध्ये घुसले व तेथील राज्यकर्ता ॲरिस्टियोनला पदच्युत केले.
- १५६२ – फ्रांसमधील वासी शहरात कॅथोलिक जमावाने १००हून अधिक हुगेनो व्यक्तिंना मारले.
- १५६५ – ब्राझिलमध्ये रियो दि जानेरो शहराची स्थापना.
- १८०३ – ओहायो अमेरिकेचे १७वे राज्य झाले.
- १८१५ – एल्बाहून सुटका करून घेउन नेपोलियन बोनापार्ट फ्रांसला परतला.
- १८४० – ॲडोल्फ थियेर्स फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

### राष्ट्रीय

- २००७ – छत्तीसगढच्या दंतेवाडा जिल्ह्यात नक्षलवाद्यानी भूसुरंग स्फोट केला यात सहा पोलिसांसह ८ लोक ठार झाले.


### जन्म

- १८१० – फ्रेडरिक चॉपिन, पोलिश संगीतकार याचा जन्म.
- १८८८ – इवार्ट ॲस्टील, ईंग्लिश क्रिकेटपटू याचा जन्म.
- १९१० – डेव्हिड निवेन, इंग्लिश अभिनेता याचा जन्म.
- १९१८ – होआव गुलार्ट, ब्राझिलचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९२२ – यित्झाक राबिन, इस्राईलचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९४२ – रिचर्ड मायर्स, अमेरिकन सेनापती याचा जन्म.

### निधन

- ११३१ – स्टीवन दुसरा, हंगेरीचे राजा यांचे निधन.
- १७९२ – लिओपोल्ड दुसरा, पवित्र रोमन स्राट यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ८१



### आडवे शब्द

१. रात्रीच्या रात्री
४. फोटो
६. राष्ट्रगीताची सुरुवात
११. शंभर पैसे
१३. बाजेची कापडी पट्टी
१४. सोन्याचा धागा
१५. वाईट
१७. हमाल
१९. निबर, एक इंग्रजी महिना
२१. अडत्या
२३. खर्चच्या विरूद्ध
२५. पोवाडे म्हणणारा
२७. फांदी तुटतानाचा आवाज
२९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव
३१. रोख
३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ
३४. मालक
३५. हे जसे-फळ तसेच!
३६. पाळता येईल असा प्राणी
३८. कोष्टी, कापड विणणारा
४०. दिल्लीचे विमानतळ
४२. छोटा, लहान
४३. सैन्य
४४. कवडीमोल
४६. शहर
४८. मुलगा, पुत्र
५१. जुळे
५२. उगीच
५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी
५६. शेतकरी (हिंदी)
५८. गाजावाजा
५९. पळून जाणे
६०. मोठी गंमत
६१. रंग बदलणारे फूल
६२. नम्र, वाकलेला
६४. एक आंबट-गोड फळ
६५. खूप
६६. चालू दिवस
६७. ओघ, पाण्याचे वाहणे
६९. थडगे
७१. फटाक्याची माळ
७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली
७४. मृत्यूदेवता
७५. जनक राजाची मुलगी
७८. झडती (हिंदी)
७९. एकूण एक, सर्व
८०. फेटाळणे
८१. लक्ष्मी

### उभे शब्द

१. अडखळत बोलणारा
३. झाड, वृक्ष
४. सावली
५. पुष्कळ
६. आई-वडील
७. नवीन
८. नडलेला अडलेला
९. मला
१०. श्रेष्ठ पुरुष
१२. पैंजण
१५. पाषण
१६. पाणकोंबडा
१७. हिंदुस्थान
१८. राबता, ये-जा
२०. धुंदी, कैफ
२२. आवडता, प्रिय
२४. कापड विणण्याचे साधन
२६. साठावा वाढदिवस
२८. कोवळी फांदी
२९. चाळीस शेर
३०. पोते शिवण्याची सुई
३३. जाड दोर
३४. पृथ्वी
३६. हालचालीवर ठेवलेली नजर
३७. वर्तुळ
३८. गणपती
३९. कमीत कमी व जास्तीत जास्त
४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी
४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. रविवार
४९. दृष्टीभेट
५०. प्रकाश, कांती
५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी
५४. देवाण-घेवाण
५५. रेलण्याची उशी
५७. प्रामाणिक
६०. श्रीमंत
६१. दाहक आम्ल (हिंदी)
६३. ग्रामीण बोलीत तेव्हा
६५. लाभदायक
६६. आजूबाजूला
६८. अंकित माणूस, हेर
६९. लावणीतील पास असे असते!
७०. प्रजा
७३. मांडणी
७४अ. मज
७५. एक मिश्र धातू
७६. ओटा, पार
७७. न्यायाने वागणारा

### शब्दकोडे क्र. ८० चे उत्तर

आडवे उत्तर : १.कोरडा ४.पारावार ६.साय ७.पर ९.सनसनाटी १२.जावई १३.दरड १५.ललकारी १६अ.बासमती १७अ.खरोखर १८.बरबाद २०.चारा २२.राही २३.प्रकाश २५.परत २६.समास २७.हालचाल २८.सारक २९.महामार्ग ३०.रव ३१.कतरण ३३.प्रतिकारक ३४.फरार ३६.काननबाला ४१.डबा ४२.नकलाकार ४४.राजीवलोचन ४७.घसा ४८.भोज्य ४९.खार ५०.समीर ५१.सामनावीर ५३.पसा ५५.दरारा ५६.पदरमोड ५८.नरम ६०.नाश ६१.बोट ६२.कप ६३.जम ६४.समरभूमी ६६.मदतनीस ६८.रणगाडा ६९.नवनीत ७०.रया

उभे उत्तर : १.कोप २.डास ३.वास ४.पाटील ५.रजा ६.साईबाबा ७.परतीचा मार्ग ८.रड १०.नजर ११.नाल १३.दम १४.आरोही १६.काया १७.सद १७अ.खराब १८.बरकत १९.रत २१.रास २३.प्रचारक २४.कालव २५.परकर २६.समाधान २७.हानिकारक २९.मणका ३२.गेलाबाजार ३३.प्रथा ३५.रामराज्य ३७.नयन ३८.बाड ३९.पर ४०.सलोखा ४२अ.लाघवी ४३.कासार ४५.चरणारविंद ४६.ठोसा ४८.भोवरा ५०.सवड ५२.नाकाम ५४.सापट ५५.दशरथ ५७.पाप ५८.नजर ५९.रमण ६०.नाम ६२.कसर ६४.सडा ६५.मीन ६६.मत ६७.तप

# विद्यादान हेच सर्वश्रेष्ठ दान : सौ. ज्योतीताई गाडे

## डोके विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

सावेडी उपनगरात निर्मलनगर येथे ज्ञानदीप प्रज्वलित करत, संस्कारांची ज्योत चेतवत आणि गुणवंतांचा गौरव साजरा करत लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यामंदिर व श्री साई माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील नवनिर्वाचित महापौर,नगरसेवकांचा सत्कार यावेळी करण्यात आला. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन अहिल्यानगर चे महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते नटराज पूजनाने झाले. "विद्यादान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे," असे प्रतिपादन करत त्यांनी शिक्षणाच्या पवित्र कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थी व शिक्षक यांच्यामधील अतूट नात्यासंबंधी सविस्तर माहिती त्यांनी सांगितली. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली. संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका श्रीमती शारदाताई ढवण,सौ.रोशनीताई त्र्यंबके, रोहन सानप, भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष श्री बोरुडे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रसाद शिंदे,पोलीस अधिकारी सौ. कल्पना अवसर,अभिषेक खामकर, माजी विद्यार्थी योगेश पिंपळे, अडबंगीनाथ माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य गहिनीनाथ गर्जे, सतीश राजगुरु, बजरंग शाळेचे सहशिक्षक मोरे सर आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असते भविष्यात देखील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्था कायम प्रयत्नशील राहील."

१९९९ साली लावलेले या शाळेचे छोटेसे रोप आज ज्ञानाच्या वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजित होत असलेला हा वार्षिक समारंभ सांस्कृतिक कार्यक्रम,गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव गुणवत्तेला प्रेरणा देणारा ठरत आहे. असे त्यांनी सांगितले

अध्यक्ष बापूसाहेब डोके व सचिव आशाताई डोके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संभाजी पवार, मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती पवार, मंजू नवगिरे, आशा धामणे, संज्योत बर्वे, भारत जगदाळे,सुजाता कर्डिले,राणी राऊत,प्रास्ताविक श्री.सोमनाथ शेलार यांनी केले. सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे तर आभार सुप्रिया वाळके यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये गायींच्या मृत्यूचे सत्र

■ पोपटराव पवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

नगर जिल्ह्यातील हिवरे बाजार, दैठणे गुंजाळ आणि टाकळी खातगाव या परिसरातील गायींना एका अज्ञात आजाराने ग्रासले असून, गेल्या काही दिवसांत सुमारे ३० गायींचा मृत्यू झाला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन आदर्श गाव संकल्प समितीचे कार्याध्यक्ष डॉ. पोपटराव पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे साकडे घातले आहे.

हिवरे बाजार (ता. नगर), दैठणे गुंजाळ (ता. पारनेर) आणि टाकळी खातगाव या ५ किमी परिघातील गावांमध्ये गायींच्या मृत्यूचे सत्र सुरू आहे. पशुसंवर्धन विभागाचे पथक, पुणे येथील तज्ज्ञ डॉक्टर आणि जिल्हा प्रशासनाने घटनास्थळी भेटी देऊन रक्ताचे नमुने, चारा,



पाणी आणि शवविच्छेदनाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले आहेत. मात्र, अद्याप या आजाराचे नेमके निदान होऊ शकलेले नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. नुकसान भरपाईत वाढ: सध्या जिल्हा परिषदेकडून केवळ १० हजार रुपये मदत मिळते, जी उपचारासाठीही अपुरी आहे. एका गायीची किंमत १ ते १.५ लाख रुपये असल्याने, शासनाने किमान ७५% नुकसान भरपाई द्यावी. आजाराचे तातडीने संशोधन- पिकांवरील तणनाशके, रासायनिक खतांचा अतिवापर आणि खाद्यातील युरिया यामुळे चारा विषबाधा होत आहे का? याची कृषी व पशुसंवर्धन विद्यापीठामार्फत तातडीने तांत्रिक चाचणी व्हावी.


विमा निकषात शिथिलता: केवळ बँक कर्ज असलेल्या जनावरांनाच विमा मिळतो, हा नियम बदलून सर्व जनावरांसाठी अल्पदरात विमा योजना सुरू करावी. तोपर्यंत दूध सोसायट्यांच्या पावत्या ग्राह्य धरून मदत द्यावी. शासकीय आदेशाची गरज - पशुपालक पूर्णपणे दूध व्यवसायावर अवलंबून असल्याने, मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिक लक्ष घालून तातडीने मदतीचे आदेश द्यावेत.

"शेतकरी आधीच संकटात आहे, त्यात दुभत्या जनावरांचा असा मृत्यू होणे हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी घातक आहे. शासनाने याकडे युद्धपातळीवर लक्ष द्यावे."

# नेटफ्लिक्सने 'हॅलो बच्चो' चा ट्रेलर केला रिलीज

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

हॅलो बच्चो–हा फक्त वर्गात उच्चारला जाणारा शब्द नाही, तर नवीन विचार आणि प्रेरणेचे प्रतीक आहे. नेटफ्लिक्सने आपल्या नव्या सिरीजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. ही सिरीज शिक्षक अलख पांडे यांच्या खास प्रवासावर आधारित आहे, ज्यांचा प्रभाव केवळ वर्गापुरता मर्यादित राहिला नाही, तर भारतातील अनेक विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत आणि मनापर्यंत पोहोचला आहे. 6 मार्च रोजी प्रीमियर होणारी ही सिरीज अशा विद्यार्थ्यांची कथा सांगते ज्यांनी आपली स्वप्ने कधीही सोडली नाहीत. त्यांच्या शिक्षकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्याच विश्वासामुळे त्यांना पुढे जाण्याची ताकद आणि धैर्य मिळाले. एका साध्या वर्गातील छोट्या सुरुवातीपासून सुरू झालेली ही कथा पुढे एक मोठी चळवळ बनते. ही पहल शहरांपासून गावांपर्यंत



आणि छोट्या गल्लीबोळांपर्यंत पोहोचते. ट्रेलरमध्ये विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या कथा दाखवल्या आहेत, पण त्यांना एकत्र जोडणारे एकच स्वप्न आहे. एका मुलाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो, एका मुलीला शिक्षण पूर्ण करण्यासाठी समाजाच्या अपेक्षा पेलाव्या लागतात, तर आणखी एका मुलाला क्रिकेटचे स्वप्न बाजूला ठेवून घरची जबाबदारी सांभाळावी लागते. त्यांच्या कथा सांगतात की शिक्षण हे काही मोजक्या लोकांचे विशेषाधिकार नाही, तर प्रत्येक मुलाचा हक्क आहे. योग्य मार्गदर्शन आणि विश्वास मिळाला तर शिक्षण आयुष्य बदलू शकते. प्रतिश मेहता यांच्या दिग्दर्शनाखाली ही सिरीज बनवण्यात आली आहे. मुख्य भूमिका विनीत कुमार सिंग यांनी साकारली असून, विक्रम कोचर आणि गिरीजा ओक गोडबोले यांच्यासह इतर कलाकारही आहेत. सतेन्द्र सोनी, सोनू कुमार यादव, अंशुल डोगरा, समता सुदिक्षा, वरुण बुद्धदेव आणि नमन जैन यांनीही प्रभावी अभिनय केला आहे. या सर्वांनी पाच विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या आणि प्रेरणादायी कथा साकारल्या आहेत. हे विद्यार्थी प्रत्येक अडचणीचा सामना करत आपल्या स्वप्नांकडे ठामपणे वाटचाल करतात. ही सिरीज अभिषेक यादव यांनी तयार केली असून, अंकित यादव, वर्नाली आणि संदीप सिंग यांनी कथा लेखन केले आहे. हॅलो बच्चो नेटफ्लिक्स आणि टीव्हीएफ यांचा आणखी एक संयुक्त प्रकल्प आहे, जी तरुण भारताचे स्वप्नं आणि चिकाटीवर आधारित कथा प्रेक्षकांसमोर मांडते.

# देहूगावात संत तुकाराम महाराज बीजसोहळ्याची भक्तिमय धामधूम

**देहूगाव : (समर्थ गांवकरी)**

संत तुकाराम महाराज बीजसोहळ्यानिमित्त देहूनगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली असून, मुख्य मंदिरासह वैकुंठस्थान मंदिर आणि गाथा मंदिर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाले आहे. येत्या 5 मार्च रोजी होणाऱ्या वैकुंठगमन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू देवस्थान संस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. सोहळ्यानिमित्त संत तुकाराम महाराज मंदिर तसेच वैकुंठस्थान मंदिर परिसराची स्वच्छता करून मंदिर आतून आणि बाहेरून धुवून चकाचक करण्यात आले आहे. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने संपूर्ण परिसर उजळून निघाला असून, भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

# विद्यार्थी सुरक्षेसाठी पोलीस व शिक्षण विभागाची संयुक्त सभा

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

शालेय विद्यार्थिनींवर वारंवार होत,असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या संदर्भात, विकृत प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी अंबरनाथ तालुका शिक्षण विभाग व पोलीस विभाग यांची तातडीची सभा बदलापुरात संपन्न झाली. विद्यार्थिनींच लैंगिक शोषण व अत्याचार झाल्याच्या घटना समोर येत असल्याने शाळेतील प्रशासनाला, शिक्षकांना विद्यार्थी सुरक्षेच्या संदर्भात काळजी घेणे, परिवहन समितीचे सर्व नियम आणि अटी काटेकोर पालन करणे, वाहनांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षा,या संदर्भात 13 मे 2025 रोजीच्या शासन आदेशावर शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी उपस्थित सर्व शाळा व्यवस्थापकांना शिक्षकांना अत्यंत उत्कृष्ट भाषाशैलीमध्ये मार्गदर्शन केले. लैंगिक शोषणापासून बालक




संरक्षण, शाळेतील तक्रार पेटीची योग्य दखल, शाळेचा सुरक्षा रक्षक , शाळांमध्ये सती सावित्री गट स्थापन करणे , शाळामध्ये सीसी टीव्ही चालू असणे, बालकांना शाळेत सोडणाऱ्या बस व्हॅन रिक्षा चालवणाऱ्या वाहन चालकाचे चारित्र्य प्रमाणपत्र असावे.बसेस (bus) ची पडताळणी , GPRS सुविधा, शाळेत मुलांना ने आण सोडणाऱ्या शाळेची गाडी RTO द्वारे permission (NOC) घेतलेली असावी, शाळेतील विद्यार्थ्यांना घरी सोडताना पालकांच्या नजरेखालीच सोडणे अशा विविध प्रकारच्या वाहन सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत काळजी घेण्याचे आदेश दिले.

यावेळी बदलापूर नगरपालिका नगराध्यक्षा सौ.रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्षा सौ. प्रियंकात दामले, एसीपी शैलेश काळे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक किशोर शिंदे, क्राईम पोलीस निरिक्षक दिनकर पगारे, गट शिक्षणाधिकारी विशाल पोतेकर, केंद्रप्रमुख सोळसे सर, जामनिक सर उपस्थित होते..

# तूर खरेदीस प्रारंभ ; १० खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष खरेदी सुरू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई यांच्या वतीने जिल्ह्यात तूर खरेदीस प्रारंभ करण्यात आला आहे.

जिल्ह्यात एकूण १० खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, संबंधित केंद्रांवर शेतकरी नोंदणी व प्रत्यक्ष खरेदी सुरू झाली असल्याची माहिती जिल्हा मार्केटिंग अधिकारी बी. आर. पाटील यांनी दिली आहे.



हंगाम २०२४-२५ करिता तुरीचा हमीभाव प्रति क्विंटल ८ हजार रुपये निश्चित करण्यात आला आहे. शेतकरी नोंदणीला दि. २४ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, खरेदी कालावधी दि. ९ फेब्रुवारी ते दि. ९ मे २०२६ असा राहणार आहे. तूर खरेदीसाठी जिल्ह्यातील खालील १० केंद्रांवर नोंदणी करण्यात येत आहे. यामध्ये शेवगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ (शेवगाव), जय भगवान स्वयंरोजगार सहकारी संस्था, पाथर्डी (मार्केट यार्ड, पाथर्डी), श्रीदत्त पणन सहकारी संस्था, श्रीगोंदा (घारगाव), रियल ॲग्रो फार्म प्रोड्यसर कंपनी, श्रीगोंदा (घुटेवाडी), जय किसान फार्मर प्रोड्यसर कंपनी, श्रीगोंदा (मांडवगण), राहुरी तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ (राहुरी), पारनेर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ (पारनेर), बहादराबाद विविध कार्यकारी सोसायटी, कोपरगाव (रांजणगाव देशमुख), चैतन्य कानिफनाथ कृषी फळे प्रक्रिया सहकारी संस्था, जामखेड (खर्डा) आणि पुण्यश्लोक कृषी पणन प्रक्रिया सहकारी संस्था, जामखेड (पिंपरखेड) यांचा समावेश आहे. सर्व खरेदी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार असून नोंदणीसाठी आधारकार्डची छायांकित प्रत, राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची प्रत (खाते क्रमांक हस्तलिखित नसलेला), चालू वर्षाचा ७/१२ व ८-अ उतारा, तूर पिकाची ऑनलाइन नोंद आणि चालू मोबाईल क्रमांक इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत.

शेतकऱ्यांनी चालू हंगामातील सर्वसाधारण सरासरी दर्जाची तूर खरेदी केंद्रांवर आणावी. एन.सी.सी.एफ. यांनी निर्धारित केलेल्या निर्देशानुसार तुरीची तपासणी करण्यात येणार आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे खरेदीसाठी बोलाविण्यात येईल. एसएमएसमध्ये नमूद केलेल्या तारखेलाच शेतमाल केंद्रावर आणणे बंधनकारक राहील, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# पवनाथडी जत्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दापोडी : (समर्थ गांवकरी)**

अनेक शोभेच्या वस्तू, पारंपरिक आधुनिक कृत्रिम दागिने, हस्तकलेच्या बॅगा, पर्स, गृहोपयोगी वस्तू, उन्हाळी पदार्थ, विविध मसाले, लोणचे, पापड, चटण्या नाश्त्याचे विविध पदार्थ व जेवणासाठीही अस्सल मराठमोळे, शाकाहारी, मांसाहारी पदार्थ अशा वैविध्यपूर्णतेने पवनाथडी जत्रा सजली आहे. या जत्रेत झणझणीत जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांची झुंबड उडत आहे. सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर रविवारपर्यंत नागरिकांना जत्रेचा आनंद घेता येणार आहे. जत्रेत विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची भरपूर प्रमाणात दुकाने, स्टॉल्स आहेत. याशिवाय सायंकाळी नागरिकांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. महिलांना रोजच्या वापरासाठी लागणारे साहित्य व इतर साहित्य उपलब्ध आहे.

HOUSE OF MCDOWELL'S SODA चा YAARI JAM: HOLI ON WHEELS

# होळीच्या सणाला अविस्मरणीय साहसात रूपांतर

**(समर्थ गांवकरी)**

House of McDowell's Soda ने नेहमीच yaari च्या जादूचा उत्सव साजरा केला आहे – मित्रांसोबत अनुभवलेले 'पहिल्यांदाच'हन देत. दैनंदिन जीवनातील टप्प्यांपासून ते आयुष्यात एकदाच येणाऱ्या खास क्षणांपर्यंत, ब्रँडचा विश्वास आहे की प्रत्येक "पहिला अनुभव" मित्रांसोबत शेअर केल्यावर आयकॉनिक बनतो.

या होळीमध्ये, हीच संकल्पना सर्वात अनोख्या स्वरूपात साकारण्यात आली. Yaari Jam: Holi on Wheels च्या माध्यमातून House of McDowell's Soda ने भारतातील सर्वात लोकप्रिय सणांपैकी एक असलेल्या होळीला मैत्रीच्या दृष्टीकोनातून नव्याने सादर केले – एक असा देखावा निर्माण केला, जो यापूर्वी कधीही अनुभवला गेला नव्हता. Publicis Groupe India च्या 'Team Spirit' द्वारे संकल्पित या उपक्रमामध्ये खऱ्या




आयुष्यातील मित्र आणि कॉमेडियन्स तनमय भट आणि आदित्य कुलश्रेष्ठ (Kullu), तसेच क्रिएटर्स अनुज गुप्ता आणि ऐश्वर्या मोहनराज यांना एकत्र आणण्यात आले – एक अनोखा होळी उत्सव साजरा करण्यासाठी. एका विस्तीर्ण मैदानामध्ये आयोजित या कार्यक्रमात दोन उच्च-कार्यक्षमता असलेल्या कार्स रंगांच्या रोमांचक खेळातील अनपेक्षित मुख्य घटक बनल्या. यानंतर रंग, हालचाल आणि खोडकरपणाचा एक विलक्षण संगम पाहायला मिळाला – ड्रिफ्ट करणाऱ्या टायर्समुळे रंगांचे स्फोट घडत होते, पाठलागादरम्यान रंगांचे बॉम्ब फुटत होते, आणि डॅश कॅम्स रंगांच्या ढगांमध्ये हरवलेल्या मित्रांच्या नैसर्गिक प्रतिक्रिया टिपत होते. रिकामे कॉंक्रीटचे मैदान हळूहळू एका जिवंत कॅनव्हासमध्ये रूपांतरित झाले – केवळ रंगांनी नव्हे, तर एकत्र अनुभवलेल्या रोमांच, हास्य आणि मित्रांसोबत पहिल्यांदाच काहीतरी नवीन करण्याच्या उत्साहाने भरलेले. या उपक्रमाविषयी बोलताना, Diageo India च्या Vice President Marketing & Category Head आनंदिता दत्ता म्हणाल्या, "House of McDowell's Soda मध्ये आम्ही मैत्रीला केवळ एक भावना म्हणून नव्हे, तर भारतातील तरुणांच्या जीवनशैलीला आकार देणारी एक सांस्कृतिक शक्ती म्हणून पाहतो. गेल्या वर्षी सुरू केलेल्या आमच्या 'Firsts with Friends' या संकल्पनेवर आधारित, Yaari Jam: Holi on Wheels या उपक्रमाद्वारे त्या भावनेला नव्या स्वरूपात साकारण्यात आले आहे.

# रमजान एनर्जी गाइड : उपवास दरम्यान सक्रिय कसे राहावे

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

पवित्र रमजान महिना आध्यात्मिकता, चिंतन आणि समाजभावनेचा काळ आहे. ३० दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत उपवास ठेवणे शारीरिकदृष्ट्या थकवणारे वाटू शकते, विशेषतः मातांसाठी, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या व्यावसायिकांसाठी. दिवसभर सतत ऊर्जा टिकवण्यासाठी की गुरुकिल्ली म्हणजे विचारपूर्वक नियोजित सहरी. सहरीमध्ये लक्ष संतुलित आणि हळूहळू ऊर्जा देणाऱ्या अन्नावर असावे, जे दिवसभर ताकद टिकवून ठेवण्यास मदत करते आणि थकवा टाळतो. पोषक घटकांनी भरलेले अन्न शरीराला सतत ऊर्जा देते आणि लांब वेळा पोट भरलेले असल्याची भावना निर्माण करते. दुसरीकडे, दिवसाची सुरुवात तळलेले किंवा खूप गोड अन्न खाल्ल्यास ऊर्जा सुरुवातीला वाढते पण नंतर अचानक कमी होते. यामुळे दिवस वाढत जाईल तसेच थकवा आणि तहान अधिक जाणवू शकतो. सहरीमध्ये विचारपूर्वक आणि पौष्टिक अन्न निवडल्यास उपवास ठेवणे सोपे



आणि ऊर्जावान वाटू शकते. बदामा मध्ये व्हिटामिन B2, व्हिटामिन E, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस मुबलक प्रमाणात असतात, जे अन्नातून ऊर्जा मिळवण्याच्या प्रक्रियेत मदत करतात. हे शरीराला निरोगी आणि टिकाऊ ऊर्जा देतात, ज्यामुळे आपण दिवसभर सक्रिय राहू शकता. सहरीमध्ये कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करणे, मग त्यांना रात्रीभर भिजवून खाल्लं किंवा स्मूदीमध्ये घालून खाल्लं, लांब वेळा उपवास ठेवताना ऊर्जा स्तर स्थिर ठेवण्यास मदत करू शकते.

# एसटी च्या 'NCMC स्मार्ट कार्ड' नोंदणीला उस्फूर्त प्रतिसाद

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) डिजिटल सेवांच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणजे 'NCMC स्मार्ट कार्ड' उपक्रम होय. सवलत धारक प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नोंदणीची संख्या आता 1 लाखाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यापर्यंत पोहोचली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ही संख्या केवळ एक आकडा नसून, एसटीच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने झेपावणाऱ्या प्रवासाची ठोस साक्ष आहे.असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले आहे. केवळ आठवड्याभरात या उपक्रमांतर्गत एकूण 1,00,021 प्रवाशांनी NCMC




स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. यात 'महिला सन्मान योजना' लाभार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग असून तब्बल 37,927 महिलांनी या आधुनिक सुविधेचा स्वीकार केला आहे. त्याचप्रमाणे 'अमृत ज्येष्ठ नागरिक' योजनेअंतर्गत 34,948 ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी करून डिजिटल प्रवासाच्या नव्या पर्वाचे स्वागत केले आहे. तसेच इतर ज्येष्ठ नागरिक 24,927 आणि इतर प्रवासी 2,219 अशा विविध घटकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.एसटी महामंडळाचा हा उपक्रम केवळ तांत्रिक बदल नसून, प्रवाशांच्या प्रवासाला अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक बनविण्याचा दूरदर्शी प्रयत्न आहे. रोख व्यवहारांच्या पारंपरिक चौकटीतून बाहेर पडत, डिजिटल माध्यमांचा स्वीकार करण्यासाठी प्रवासी वर्ग मोठ्या प्रमाणात पुढे येत असल्याचे या नोंदणीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. 1 मार्चपासून NCMC स्मार्ट कार्ड असल्याशिवाय सवलत धारक प्रवाशांना प्रवास करता येणार नाही, अशी अफवा समाज माध्यमांवर पसरली होती. तथापि, जोपर्यंत 80% सवलत धारक प्रवाशांची स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य केले जाणार नाही, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रवाशांनी आपल्या जवळच्या बसस्थानक, आगार अथवा अधिकृत खासगी एजंट कडे स्मार्ट कार्ड नोंदणी करावी , असे आवाहन महामंडळातर्फे केले आहे.

***भविष्यात NCMC स्मार्ट कार्डमुळे सवलत धारक प्रवाशांना तिकीट खरेदी अधिक सुलभ होणार असून, भविष्यात एकच कार्ड विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी उपयोगात येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. एसटी महामंडळाने हाती घेतलेला हा अभिनव उपक्रम डिजिटल महाराष्ट्राच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरत असून, प्रवाशांच्या विश्वासाच्या बळावर हा प्रवास अधिक वेगाने पुढे जात आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.***

***(अभिजीत भोसले)***
***जनसंपर्क अधिकारी***



# सेमीकंडक्टरच्या भारताच्या नियोजनाने तैवान आणि दक्षिण कोरियाही चकित

कोविडच्या काळात जगाला सेमीकंडक्टर (अर्धसंवाहक संयंत्र) आणि चिप्सच्या कमतरतेचा सामना करावा लागला. त्यामुळे मोबाईल हँडसेटपासून वाहनांपर्यंतच्या साहित्याचा तुटवडा निर्माण झाला होता. त्या काळात ऑटो आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रावर सर्वाधिक परिणाम दिसून आला. कोविडपूर्वी चीनमध्ये ८० टक्क्यांहून अधिक चिप्स आणि सेमीकंडक्टर तयार केले जात होते. कठोर कोविड निर्बंधांमुळे चीनमध्ये उत्पादन थांबले. त्याचा परिणाम जगभर दिसून आला. चीनची ही मक्तेदारी संपवण्यासाठी भारत पुढे आला. अनेक अमेरिकन कंपन्यांच्या मदतीने भारताने सेमीकंडक्टरबाबत अशी योजना बनवली आहे, ज्याच्या अंमलबजावणीनंतर येत्या पाच वर्षांमध्ये भारत जागतिक सेमीकंडक्टर क्षेत्रामध्ये महासत्ता म्हणून उदयाला येईल. त्यामुळे चीन, कोरिया आणि तैवानसारख्या देशांची मक्तेदारी पूर्णपणे नष्ट होईल.

नव्या डिझाइन क्षमता आणि दहा अब्ज डॉलरच्या प्रोत्साहनांसह भारत सेमी कंडक्टर क्षेत्रात आपले नवे स्थान निर्माण करेल. त्यामुळे जागतिक उत्पादक नवीन फॅब आणि युनिटस् स्थापन करण्यासाठी आकर्षित होतील आणि या क्षेत्रातील तैवान, दक्षिण कोरिया आणि चीनसारख्या देशांचे वर्चस्व कमी होईल. जागतिक कंपन्यांची विचारसरणी आता बदलत आहे आणि त्यांना लवकरच भारतात गुंतवणूक करायची आहे. सेमीकंडक्टर हा इलेक्ट्रॉनिक घटकांचा एक आवश्यक भाग आहे. वाहनांपासून ते संगणक, मोबाईल फोन आणि अगदी वॉशिंग मशीनपर्यंत सर्व गोष्टींमध्ये याचा वापर केला जातो. रेनॉल्ट-निसान ते ह्युंदाई यासारख्या जगातील सर्वोत्तम वाहन कंपन्यांचे कारखाने भारतात आधीच आहेत. याशिवाय डेल आणि ॲपल या संगणक कंपन्यांचे पुरवठादारही येथे आहेत. इलेक्ट्रॉनिक्स कंपनी सॅमसंगनेही येथे आपली उपस्थिती लावली आहे.

भारताला आता वेगाने वाढणाऱ्या सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये मॅन्युफॅक्चरिंग व्हॅल्यू चेनचा विस्तार करायचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेत्त्वृवाखालील सरकारने मायक्रोन आणि टाटा यांच्यासह चार खेळाडूंना ७६,००० कोटी रुपयांचे प्रोत्साहन दिले आहे. चीनच्या जागी भारत आता एक लोकशाही आणि विश्वासार्ह तंत्रज्ञान क्षेत्र म्हणून स्वतःला सादर करत आहे. आज सेमीकंडक्टर क्षेत्रातल्या प्रत्येक मोठ्या खेळाडूला आपल्या गुंतवणूक योजनेवर पुनर्विचार करायचा असून भारतात यायचे आहे. याचे कारण काळजीपूर्वक तयार केलेली धोरणे. भारतामध्ये आता सेमीकंडक्टर मूल्य शृंखलेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. देशांतर्गत क्षेत्रातील चॅम्पियन कंपन्यादेखील अशा उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात प्रवेश करण्यास तयार होतील. मागील आठवड्यात केंद्र सरकारने टाटा समूहाच्या एकूण १.२६ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह तीन सेमीकंडक्टर प्लांट्सची स्थापना करण्याच्या प्रस्तावांना मान्यता दिली. भारत आता चिप उत्पादकांमध्ये स्वतःला एक शक्ती म्हणून सादर करत आहे. अलीकडील घोषणेनुसार, टाटा इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड तैवानच्या पॉवरचिप सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन सोबतच्या भागीदारीत गुजरातमधील धोलेरा स्पेशल इंडस्ट्रियल एरियामध्ये सेमीकंडक्टर फॅबची स्थापना करेल. या प्लांटमध्ये मासिक आधारावर ५०,००० युनिट्स बनवण्याची क्षमता असेल. यामध्ये ९१,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याशिवाय आसाममधील जागीरोड येथे नवीन सेमीकंडक्टर असेंब्ली आणि टेस्टिंग प्लांटसाठी टाटाच्या प्रस्तावालाही सरकारने मंजुरी दिली आहे. २७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ही सुविधा उभारण्यात येणार आहे. यामुळे या क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष २७ हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.





# जीडीपी वाढ आणि सेमीकंडक्टर्स

**गेल्या** पंधरवड्यात शेअर बाजाराचा निर्देशांक सुमारे एक हजार अंकांनी वाढून ७४ हजारांच्या उंबरठ्यावर उभा राहिला आहे. बीएसई स्मॉलकॅप्स निर्देशांक सुमारे हजार अंकांनी कमी होऊन ४५,५०० च्या आसपास पोहोचला आहे. बाजारात काही दिवस थोडी घसरण बघायला मिळाली पण लवकरच बाजाराने उसळी घेतली. याचे मुख्य कारण म्हणजे तिसऱ्या तिमाहीमध्ये जीडीपीमध्ये झालेली ८.४ टक्कयांची घसघशीत वाढ. सर्व विश्लेषकांना आणि सरकारलाही ७.६ टक्कयांची वाढ अपेक्षित असताना वाढीचे त्याहून जास्त आकडे समोर आल्याने सगळ्यांनाच आश्चर्याचा सुखद धक्का बसला. युरोप अमेरिकेमध्ये तसेच बाकी देशांमध्ये असलेल्या मंदीसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही वाढ विलक्षणच म्हणावी लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेची सुरू असलेली ही घोडदौड पुढील काही वर्षे कायम राहण्यासाठी अनेक सकारात्मक घटक काम करत आहेत.

गेल्या आठवड्यात झालेली आणखी एक महत्वाची घोषणा म्हणजे सरकारने १.२६ लाख कोटी खर्चाच्या तीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना दिलेली मंजुरी. सेमीकंडक्टर म्हणजे अर्धसंवाहक संयंत्र. त्याच्या उत्पादनात तैवान, दक्षिण कोरिया, जपान आणि अमेरिका हे चीनच्या समोर असले तरी निर्यातीत मात्र चीन पहिल्या स्थानावर आहे. त्यामुळे कोविडकाळात चीनची निर्यात खूप घटल्याने सेमीकंडक्टरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता आणि विद्युत गाड्या, टेलीकॉम, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल आणि संरक्षण या क्षेत्रांना मोठी झळ सहन करावी लागली. बऱ्याच नवीन मोटारगाड्यांसाठी ग्राहकांना वर्षभराच्या प्रतीक्षाकाळाला सामोरे जावे लागले. कुठल्याही देशाला संरक्षण क्षेत्रामधील परावलंबिता परवडणारी नसते. आता सरकारने या अतिमहत्वाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी तातडीची पावले उचलली असून या घोषणेच्या आधीही फॉक्सकॉनसारख्या विदेशी कंपन्यांनी भारतात सेमीकंडक्टरच्या उत्पादनाची घोषणा केली आहे. जागतिक स्तरावर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था सद्यस्थितीत अडचणीत आहेत. त्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेची मजबूत स्थिती, केंद्रातील स्थिर सरकार, व्यवसायाभिमुख धोरणे आणि मोठी स्वदेशी बाजारपेठ या सर्व बाबींमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी भारत हा चीनला मजबूत पर्याय म्हणून समोर आला आहे. त्यातच चीनच्या अपारदर्शी एकाधिकारशाही सरकारच्या तुलनेत भारताचे लोकशाही सरकार युरोपीय आणि अमेरिकन कंपन्यांना जास्त भावते. या सर्व कारणांमुळे भारतीय उद्योगक्षेत्रात परकीय गुंतवणुकीचा ओघ उत्तरोत्तर वाढत चालला आहे. ॲपल, मायक्रोसॉफ्ट, गूगलसारख्या अमेरिकन कंपन्या तसेच मध्यपूर्व आणि दक्षिणपूर्व प्रदेशातील देशांच्या कंपन्या आता भारतात अधिकाधिक गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक आहेत.



# निर्यातीमुळे कांदा दरावर शून्य परिणाम होण्याची शक्यता

**केंद्र** सरकारने कांद्याच्या निर्यातीला काही अटी-शर्थींसह परवानगी दिल्यानंतरच्या हालचालींकडे बाजारपेठेचे लक्ष लागले आहे. बांग्लादेशामध्ये ५० हजार मेट्रीक टन कांद्याची निर्यात करण्यासाठी केंद्राने परवानगी दिली आहे. मात्र त्यामुळे देशातील कांद्याच्या दरावर कोणताही परिणाम होण्याची शक्यता नाही.

अलिकडेच 'नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्स्पोर्ट' मार्फत करण्यात येणाऱ्या कांद्याच्या निर्यातीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याची निर्यात सुरू करण्यासाठी शेतकरी आग्रही आहेत. त्यानुसार आता कांद्याची ही निर्यात होणार असली तरी देशभरातील कांद्याचे एकूण उत्पादन आणि केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालय विभागाच्या विदेश व्यापार महासंचलनालयाची ही अधिसूचना पाहता शेतकऱ्यांना फारसा फायदा होणार नसल्याचे स्पष्ट होत आहे.

कांदा व्यापारी आणि अभ्यासकांच्या मते, निर्यातीचा कोटा कमी असल्यामुळे बाजारावर मोठा परिणाम होण्याची शक्यता नाही. या निर्णयामुळे कांद्याच्या भावात काहीशी सुधारणा होऊ शकते इतकेच. अर्थात ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यातबंदी कायम राहणार असल्याची भूमिका सरकारने घेतली आहे, हेदेखील विसरुन चालणार नाही.

# पाच महिन्यांमध्ये एक कोटींहून अधिक नवीन गुंतवणूकदार

**गेल्या** दोन वर्षांमध्ये बाजारात तीन कोटींहून अधिक नवीन गुंतवणूकदार आले असून त्यापैकी एक कोटी गुंतवणूकदार गेल्या पाच महिन्यांमध्ये सामील झाले आहेत. हा आकडा नऊ कोटींवर पोहोचला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये गुंतवणूकदारांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी गुंतवणूकदारांची संख्या सहा कोटींच्या आसपास होती. ती आता नऊ कोटींवर गेली आहे. देशांतर्गत शेअर बाजारात किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग सातत्याने वाढत असल्याचे यावरून दिसून येते. राष्ट्रीय शेअर बाजारात नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या सहा कोटींवरून सात कोटींपर्यंत वाढण्यासाठी सुमारे नऊ महिने लागले. त्यानंतर अवघ्या आठ महिन्यांमध्ये आणखी एक कोटी नवीन गुंतवणूकदार बाजारात आले. म्हणजेच पुढील आठ महिन्यांमध्ये शेअर बाजारातील गुंतवणुकदारांची संख्या सात कोटींवरून आठ कोटींवर पोहोचली. राष्ट्रीय शेअर बाजारामधील नोंदणीकृत क्लाएंट कोडची एकूण संख्या १६.९ कोटी इतकी आहे.



गेल्या पाच वर्षांमध्ये स्टॉक एक्सचेंजच्या गुंतवणूकदारांच्या संख्येत तिपटीने वाढ झाली आहे. जलद डिजिटलायझेशन, गुंतवणूकदारांमध्ये वाढती जागरूकता, आर्थिक समावेश आणि शेअर बाजाराची उत्कृष्ट कामगिरी यामुळे अधिकाधिक गुंतवणूकदार बाजाराकडे आकर्षित होत आहेत. शेअर बाजारात रोज नवनवीन विक्रम प्रस्थापित होत आहेत. देशांतर्गत बाजाराबद्दल बोलायचे तर, बीएसई सेन्सेक्स आणि एनएसई निफ्टी हे दोन्ही प्रमुख निर्देशांक सातत्याने विक्रम करत आहेत. गेल्या वर्षामध्ये निफ्टी सुमारे ३० टक्क्यांनी वाढला आहे तर निफ्टी ५०० निर्देशांकात सुमारे ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

# पर्यटन उद्योगात वाढते रोजगार

**जागतिक** मंदीच्या सावटाचा परिणाम भारतातही दिसून येत आहे. अशातच पुढे आलेली काहिशी दिलासादायक बातमी म्हणजे हॉस्पिटॅलिटी आणि पर्यटनक्षेत्रात येत्या पाच ते सात वर्षांमध्ये तब्बल पाच कोटी रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. सरकारने पाठिंबा दिल्यास हे लक्ष्य सहज साध्य करता येईल, असे 'हॉटेल्स असोसिएशन ऑफ इंडिया' (एचएआय) ने सांगितले. त्यासाठी पर्यटन आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्राला उद्योग आणि पायाभूत सुविधांचा दर्जा देण्याची गरज आहे. हा पाठिंबा मिळाल्यास या क्षेत्रात कोट्यवधी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.

'एचएआय'चे अध्यक्ष पुनीत छठवाल यांनी सांगितले की, 'हॉस्पिटॅलिटी क्षेत्राला उद्योग आणि पायाभूत सुविधांचा दर्जा मिळाल्यास उत्पन्न आणि रोजगारही वाढेल. पर्यटन हा विकासाचा आधारस्तंभ आहे. देशातील एकूण रोजगारामध्ये ते दहा टक्के योगदान देत आहे. याशिवाय, त्याचा जीडीपीमध्ये आठ टक्के वाटा आहे. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. या क्षेत्राला फक्त योग्य धोरणांची गरज आहे.'

'रॅडिसन हॉटेल ग्रुप'चे अध्यक्ष केबी काचरू म्हणाले की, 'गेल्या दोन वर्षांमध्ये नोकरभरतीत २७१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भविष्यात पाच कोटी नोकऱ्यांचे उद्दिष्ट गाठता येईल. यावरून या क्षेत्राची प्रगती झपाट्याने होत असल्याचे स्पष्ट होते. आता आपण प्रत्येक किंमत श्रेणीच्या पर्यटनावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. प्रत्येक उत्पन्न गटातील लोकांना सेवा पुरवायची आहे.' यापूर्वी अमिताभ कांत यांनी या क्षेत्रातील कंपन्यांना उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या स्थितीसाठी सरकारशी संपर्क साधण्याचे आवाहन केले होते. पर्यटन उद्योग आपण मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या निर्माण करत आहोत, हे राजकारण्यांना दाखवून देण्यात आतापर्यंत अपयशी ठरला आहे. थायलंडमध्ये सुमारे दोन कोटी, मलेशियामध्ये १.५ कोटी आणि भारतात ७८ लाख रोजगार पर्यटनाच्या माध्यमातून निर्माण झाले आहेत.



# स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युच्युअल फंडांवर सेबीचा बडगा

**काही** दिवसांपूर्वी 'सेबी'ने एएमएफआयमार्फत म्युचुअल फंड चालवण्याऱ्या वित्त संस्थांना, स्मॉल आणि मिडकॅप्स म्युच्युअल फंडांना गुंतवणूकदारांच्या आर्थिक संरक्षणासाठी पावले उचलण्याच्या सूचना दिल्या. स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स कंपन्यांच्या समभागांच्या मूल्यांकनात गेल्या एक वर्षात निर्माण झालेल्या अभूतपूर्व वाढीमुळे बुडबुडासदृश परिस्थिती निर्माण झाली. त्यासंदर्भात ही पावले उचलायची आहेत आणि सेबीला २१ दिवसांमध्ये याचे उत्तर द्यायचे आहे.

स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युच्युअल फंडांच्या गुंतवणुकदारांवर याचे काही ठळक परिणाम होऊ शकतात आणि त्यामुळे हा नक्की काय प्रकार आहे हे समजून घेणे फार महत्वाचे आहे. सेबीच्या नियमांनुसार स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युचुअल फंडांना आपल्याकडे असलेल्या आणि येणाऱ्या पैशांपैकी कमीत कमी ६५ टक्के गुंतवणूक ही स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स कंपन्यांच्या समभागांमध्ये करावी लागते. उरलेला ३५ टक्के पैसा ते कुठेही म्हणजे लार्जकॅप्स, स्मॉलकॅप्स, मिडकॅप्स किंवा रोकड स्वरूपात ठेवू शकतात. बहुतेक फंड पाच टक्के पैसा (गुंतवणूकदारांची पैसे परत घेण्याची मागणी आली तर त्यासाठी) ठेवून बाकी ३० टक्के रक्कम चांगला परतावा मिळवण्यासाठी समभागांमध्ये गुंतवून टाकतात.

गेल्या एका वर्षात स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स कंपन्यांना गुंतवणूकदारांचे प्राधान्य राहिले आहे. त्यामुळे एसआयपीच्या माध्यमातून स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युच्युअल फंडांकडे प्रचंड प्रमाणात पैसा आला आणि तो सर्व स्मॉलकॅप आणि मिडकॅप कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवला गेला. स्मॉलकॅप आणि मिडकॅप कंपन्या लार्जकॅप कंपन्यांच्या तुलनेत खूप छोट्या असतात आणि त्यांचे भागभांडवल आणि बाजारमूल्य लार्जकॅप कंपन्यांच्या तुलनेत खूप कमी असते. अशा वेळी बाजारात स्मॉलकॅप आणि मिडकॅप कंपन्यांवर खूप पैसा लावला जातो तेव्हा त्यांचे भाव खूप कमी काळात अनेकपटींनी वाढतात. आणि त्यांचे मूल्यांकनही (पीई गुणोत्तर) अनेकपटींनी वाढते. असे अतिजास्त मूल्यांकन होते तेव्हा शेवटी केव्हा तरी वजनाने लादलेल्या उंटाला जसा काडीचा भारही जास्त होतो आणि तो कोसळतो तसा शेअर बाजार कोसळतो.

सामान्य किरकोळ गुंतवणुकदाराला याची माहिती नसते. तो फक्त त्यांच्या फंडाचे वाढते निव्वळ मालमत्ता मूल्य (एनएव्ही) बघत असतो आणि पैसे लावत जातो. वाढती एनएव्ही बघून अधिकाधिक गुंतवणूकदार त्यात पैसे लावण्यासाठी आकर्षित होतात. त्यांना बरेचदा कंपन्यांची मूलभूत स्थिती आणि मूल्यांकन म्हणजे काय हेही माहीत नसते. शेवटी बाजार कोसळतो तेव्हा त्यांचे हात पोळून निघतात.

२०२३ या वर्षात म्युचुअल फंडांमध्ये झालेल्या १.६ लाख करोड रुपयांच्या गुंतवणुकीपैकी तब्बल ६४ हजार करोड रुपये म्हणजे ४० टक्के गुंतवणूक स्मॉल आणि मिडकॅप म्युच्युअल फंडांमध्ये झाली आहे. स्मॉल कॅप्स फंडांचे एयूएम म्हणजे त्यांच्याजवळ असलेल्या मालमत्तेची किंमत किंवा त्यांचे बाजारमूल्य जानेवारी २४ मध्ये जानेवारी २३ च्या तुलनेत ८९ टक्के वाढून १.३१ वरून २.४८ लाख करोड रुपयांवर पोहोचले आहे तसेच मिडकॅप फंडांचे बाजारमूल्य जानेवारी २४ मध्ये जानेवारी २३ च्या तुलनेत ५८ टक्यांनी वाढून १.८३ वरून २.९ लाख करोड रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

या पार्श्वभूमीवर सेबीचा ताजा निर्णय स्वागतार्ह आहे. आता बरेच फंड मॅनेजर बहुधा स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युचुअल फंडांमध्ये एसआयपीचा ओघ थोडा रोखतील. एकरकमी गुंतवणुकीवर निर्बंध घालतील, दर दिवशी विशिष्ट रकमेपेक्षा जास्त रक्कम परत देण्यावर निर्बंध घालतील आणि थोडा पैसा लार्ज कॅप्स फंडांकडे वळवतील. परिणामी, स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युच्युअल फंडांच्या एनएव्हीची घोडदौड थांबेल आणि लार्जकॅप्स फंड थोडे वाढतील.

किरकोळ गुंतवणूकदारांनी हे समजून घेणे आणि शक्य असल्यास स्मॉलकॅप्स आणि मिडकॅप्स म्युचुअल फंड थोडे तरी विकून नफा गाठीस लावणे किंवा तो लार्जकॅप्स फंडांकडे वळवणे शहाणपणाचे ठरेल.

# अमेरिकेत बटाटे अडीचशे रुपये किलो!

**देशातील** जवळपास सर्वच घरांमध्ये भाजीसाठी बटाट्याचा वापर केला जातो. देशासह परदेशातही भाजीसाठी तसेच विविध पदार्थ तयार करण्यासाठी बटाट्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. पश्चिम उत्तर प्रदेशमध्येही बटाट्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. दरम्यान, भारतात दहा ते ४० रुपये किलो दराने मिळणाऱ्या बटाट्याची अमेरिकेतील किंमत प्रति किलो अडीचशे रुपये आहे!

बटाट्याची किंमत ही त्याच्या प्रकारावर आणि आकारावर अवलंबून असते. त्यामुळे बाजारात वेगवेगळ्या दराचे बटाटे मिळतात. सर्वसाधारणपणे, प्रत्येक घरात आणि प्रत्येक खाद्यपदार्थाच्या दुकानात बटाटे वापरले जातात. बटाट्याची किंमत बहुतांश भागांमध्ये दहा ते चाळीस रुपये प्रति किलो आहे. एका अहवालानुसार, सध्या अमेरिकेत एक किलो बटाट्याची किंमत ३.०१ डॉलर्स म्हणजे सुमारे २५० रुपये प्रति किलो आहे. साधारणपणे आपल्याकडे वर्षभर बटाटा खाल्ला जातो. कारण त्याची किंमत कमी असते. सध्या किरकोळ बाजारात बटाट्याची किंमत २० ते २५ रुपये प्रति किलो आहे. वर्षभर जास्तीत जास्त ३० ते ५० रुपये किलो या दराने बटाटे विकले जातात; पण अमेरिकेत बटाट्याची किंमत मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

बटाट्याचे लाल, पांढरा, पिवळा आणि जांभळा असे प्रमुख प्रकार आहेत. प्रत्येक प्रकारच्या बटाट्याची किंमत वेगळी आहे. एका अहवालानुसार, लाल बटाटे सर्वात स्वस्त आहेत तर जांभळे बटाटे सर्वात महाग आहेत. भारत जगातील अनेक देशांना अन्नधान्यासह फळं व भाजीपाल्याची निर्यात करतो. सर्वच प्रकारच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी आहे. भारतातील देशी बटाट्यांना परदेशात विशेष मागणी आहे. देशी बटाट्यांमुळे परदेशी लोकांमध्ये देशाची एक खास ओळख निर्माण झाली आहे. भारतीय देशी बटाटे श्रीलंका, ओमान, इंडोनेशिया, मलेशिया, मॉरिशस अशा अनेक देशांमध्ये निर्यात केले जातात. भारताच्या एकूण बटाटा उत्पादनात सहा राज्यांचा ९० टक्के वाटा आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, गुजरात, मध्य प्रदेश आणि पंजाबच्या शेतकऱ्यांनी बटाटा उत्पादनात सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. या सहा बटाटा उत्पादनात उत्तर प्रदेश अव्वल स्थानावर आहे. या राज्यात २९.६५ टक्के शेतकरी बटाट्याचे उत्पादन घेतात. पश्चिम बंगालमध्ये २३.५१ टक्के, बिहारमध्ये १७.२ टक्के, गुजरातमध्ये ७.०५ टक्के आणि मध्य प्रदेशमध्ये ६.६८ टक्के तर पंजाबमध्ये ५.३२ टक्के शेतकरी बटाट्याचे उत्पादन होत आहे.

